शनिवार । १७ मे १९८० । ७५ पैसे

# माणूस



चांदरात

निळे डोंगर तांबडी माती

धुक्यातून लाल ताऱ्याकडे

खडक कोरतात आकाश

चौकोनी आकाश

पांढरी शिडे

रक्ताची फुले

अनंतिका

**काणेकर गेले असले तरी**
**या वाङमयरूपाने ते रसिकांच्या**
**अंतःकरणात कायमचे**
**वास्तव्य करून आहेत... ... ...**

श्रद्धांजली ... पृष्ठ १३

# निवडणुका : महाराष्ट्र

## उदासीनतेचा धोका

वा. दा. रानडे

महाराष्ट्रातील राजकीय चित्र १९७७ व १९७८ पेक्षा या वेळी खूपच बदलले आहे; पण लोकसभा निवडणुकीनंतर गेल्या चार महिन्यांत इंदिरा काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष वाढत आहेत हे स्पष्ट आहे. विरोधी पक्ष विघटित नसते तर या संघर्षाचा निश्चित फायदा त्यांना उठविता आला असता; पण या वेळी तशी परिस्थिती नाही. इंदिरा काँग्रेसमधील बंडखोरीमुळे त्या पक्षाची मते थोडीफार कमी होतील. या बंडखोरीचा विरोधकांनी प्रचारासाठी जास्तीत जास्त उपयोग जरूर करून घ्यावा; पण त्यामुळे त्यांचे बळ फारसे वाढणार नाही हे त्यांनी वस्तुनिष्ठपणे ओळखायला हवे.

मतदार अनपेक्षित धक्के देतो तसे या वेळी घडेल का ? गेल्या चार महिन्यात इंदिरा सरकारची प्रतिमा तरी नाकर्ते सरकार यापेक्षा कोणती निराळी आहे ? परिस्थिती सुधारण्यासाठी कोणते ठोस उपाय सरकारने योजले आहेत ? आणखी काही बँकांचे राष्ट्रीयीकरण केले, काळा बाजार व साठेबाजी करणारांविरुद्ध प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याचा वापर करून काही थोड्या ठिकाणी छापे घातले, माल जप्त केला व व्यापाऱ्यांना अटक केली; पण त्यामुळे परिस्थितीत काय फरक पडला ? भाववाढ कायमच आहे ! कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारलेली नाही. पिंपळगाव, बसवंत येथे–कांदा–आंदोलनावर एस. आर. पी. पोलिसांनी केलेला गोळीबार लोक विसरलेले नाहीत ! अंतुलेगट, दादागट, प्रेमलाबाई चव्हाणगट, शंकरराव चव्हाणगट यांच्यातील सत्तास्पर्धेचे ओंगळ प्रदर्शन दिल्लीतील तिकिटवाटपाच्या जत्रेत घडले. 'मी गोंधळून गेलो आहे; पण बंड करणार नाही !' असे वसंतदादा म्हणतात. 'उमेदवार काकींनी ( प्रेमलाबाई चव्हाणांनी ) निवडले आहेत त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी मुख्यत: त्यांची आहे. आम्ही मदत करू !' असे यशवंतराव मोहिते म्हणतात. या नेत्यांचे अनुयायी बंडखोरी करतील का ? बंडखोरी केली नाही तरी उदासीन राहतील का ? उमेदवार पडला तर त्याच्या पराभवाचे खापर आपल्यावर फोडले जाईल, आपल्याला इंदिरा काँग्रेसमध्ये स्थान राहणार नाही, याची त्यांना कल्पना आहे. बंडाचा विचार मनात असला तरी निवडणुकीपूर्वी ते तो अंमलात आणतील असे वाटत नाही. निवडणुकीनंतर मंत्रिमंडळ बनावात आपल्या आकांक्षा कितपत साध्य होतात हे पाहून ते याबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले तरी अंतर्गत गटसंघर्षामुळे मंत्रिमंडळाला स्थैर्य लाभणे कठीण जाईल असे चित्र आजच दिसत आहे. वसंतदादांनी अजूनही इंदिरा काँग्रेसबाहेर पडावे आम्ही त्यांच्याकडे नेतृत्व सोपवायला तयार आहोत ही शरद पवारांची सूचना वसंतदादांनी उघडपणे फेटाळून लावली असली आणि निवडणुकीपूर्वी दादांचा गट बंड करण्याची शक्यता नसली तरी निवडणुकीनंतर मंत्रिमंडळ बनावात योग्य स्थान न मिळाल्यास या बंडाची शक्यता जमेस धरावी लागेल. दडपणाचे एक तंत्र म्हणूनही याचा अवलंब दादा करतील !

प्रश्न आहे मतदार या साऱ्या गोष्टींचा काय अर्थ लावणार आणि मतदान कशा पद्धतीने करणार ? या निवडणुकांमध्ये काही अर्थ नाही, कोणत्याही पक्षाला निवडून दिले तरी परिस्थितीत काही फरक पडत नाही, अशा प्रतिक्रिया होऊन मतदार उदासीन राहण्याचा संभव आहे. विशेषत: सुशिक्षित मध्यम वर्गीय मंडळी तर मतदानाबद्दल नेहमीच उदासीन असतात. बुद्धिजीवीवर्गास राजकारणात आता काही स्थान राहिलेले नाही. त्यामुळे राजकारणाचा त्यांना उबग आला असून कशाला मत द्यावयाचे अशी मनोवृत्ती त्यांच्यात निर्माण झाली आहे हा शहरी मतदार जनता पक्ष आणि भारतीय जनतापक्ष यांचा मुख्य आधार ! त्याची उदासीनता झटकून टाकून त्याला मतदानकेंद्रा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : एकावन्नावा
१७ मे १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

वर आणण्याचे प्रयत्न या दोन्ही पक्षांनी करायला हवेत. मतदान कमी झाले तर त्याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळतो· कारण मतदान कमी होते ते मुख्यतः इंदिरा काँग्रेस विरोधकांचे.

मतदाराला मतदान करण्यात उत्साह वाटावा अशी परिस्थिती नाही. इंदिरा काँग्रेसची अधिकारशाहीप्रवृत्ती पसंत नाही; पण प्रभावी विरोधी पक्ष अस्तित्वात नाही त्यामुळे मत कोणाला द्यावयाचे असा गोंधळ त्यांच्या मनात आहे. जानेवारी १९८० च्या लोकसभा निवडणुकीत आपण इंदिरा काँग्रेसला विजयी करून देशाची सत्ता त्या पक्षाचे हाती सोपविली; पण गेल्या चार महिन्यांचा अनुभव लक्षात घेता आपण केले हे योग्य केले का असा प्रश्न मतदारांनी स्वतःला विचारायला हवा. चार महिन्यांचा काळ फार थोडा आहे. इंदिरा काँग्रेसला आणखी संधी द्यावयास हवी अशीही मतदारांची प्रतिक्रिया होणे शक्य आहे; पण मतदारातील उत्साहाचा अभाव लक्षात घेता इंदिरा काँग्रेसला या निवडणुकीत यश मिळाले तरी १९७२ च्या विधानसभा निवडणुकांएवढे ते मोठं असेल का? इंदिरा काँग्रेसचे नेते २२५ ते २३० जागांचे अंदाज व्यक्त करीत आहेत. १९७२मध्ये २२२ जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या; पण त्या वेळी काँग्रेस आजच्यासारखी फुटलेली नव्हती. यशवंतराव चव्हाण त्या वेळी इंदिरा गांधींच्या बाजूला होते. या वेळी ते दुसऱ्या काँग्रेसमध्ये आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांचा प्रभाव काही जाणवला नाही; पण विधानसभा निवडणुकीत जाणवेल असा विश्वास त्यांचे अनुयायी व्यक्त करीत आहेत, पण १९७८ एवढ्या जागा तरी हा पक्ष मिळवू शकेल का याची शंका वाटते.

विरोधी पक्ष विघटित आहेत. राजकीय शक्तींच्या नव्या मांडामांडीपूर्वीचा हा काळ आहे. या निवडणुकांचा एकच फायदा म्हणजे सर्वच विरोधी पक्षांना आपले खरे बळ कळून येईल. ते एकदा अजमावून पहावे असे त्यांना वाटत आहे तर एकदा तो प्रयोग होऊन जाऊ द्या!

महाराष्ट्रात लोकदलाला काही स्थान नाही हे लोकसभा निवडणुकीत दिसून आलेच आहे. अरस काँग्रेस, जनता पक्ष आणि भा. ज. प. यापैकी लोकांचा पाठिंबा कोणाला अधिक याची कसोटी या निवडणुकीत लागणार आहे. भा. ज. प. म्हणजे जुना जनसंघ अशी त्याची प्रतिमा सर्वसामान्य जनतेत आहे. पक्षाचे नेतृत्व जनसंघीय नेत्यांकडे आहे; पण जनसंघाबाहेरच्या गटांचा पाठिंबा मिळण्याच्या उद्देशाने भा. ज. प. हे नाव त्या नेत्यांनी नव्या पक्षास दिले. त्यांच्या भाषणातूनही जुन्या जनसंघाच्या भूमिकेचे पुरस्कारापेक्षा जयप्रकाशजींचे संपूर्ण क्रांतीचे उद्दिष्ट गाठण्यावर भर दिला जात आहे हा पवित्रा केवळ मते मिळविण्यासाठीच आहे का? अशा शंका लोकांच्या मनात आहेत. संपूर्ण क्रांतीच्या उद्दिष्टावर या पक्षाचा खरोखरच विश्वास असेल तर निवडणुकीच्या राजकारणात त्याने स्वतःला फार गुरफटून न घेता लोकसमित्यांचे संघटन आणि अन्यायाविरुद्ध तसेच जनतेच्या निकडीच्या मागण्यांसाठी शांततापूर्ण संघर्ष यावर भर द्यावयास हवा; पण या कार्याकडे दोन्ही जनता पक्षांकडून दुर्लक्षच होत असलेले दिसते. जनता राजवटीच्या काळातही संपूर्ण क्रांतीचा उद्घोष केवळ लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी करण्यात आला. त्या दृष्टीने निष्ठापूर्वक कार्य फार थोडे झाले. आज खरी आवश्यकता त्या कार्याचीच आहे! □

## दृष्टिक्षेपात महाराष्ट्र निवडणूक

एकूण जागा २८८

'मराठवाड्यातील सिरोंचा ही जागा इंदिरा काँग्रेसला अविरोध मिळाली.

निवडणूक २८७ जागांची

उमेदवार १५१५

| | |
|---|---|
| इंदिरा काँग्रेस | २८८ |
| अरस काँग्रेस | १९१ |
| जनता | १०९ |
| भा. ज. प. | १४५ |
| रिपब्लिकन ( सर्व गट ) | ९३ |
| मार्क्सवादी | १० |
| कम्युनिस्ट | १२ |
| शेकाप | ३८ |
| पुरोगामी गट | ४ |
| मुस्लीम लीग ( सर्व गट ) | ७ |
| हिंदुमहासभा | ८ |
| जनता एस (चरण) | २३ |
| जनता एस (राज) | १६ |
| अपक्ष | ५७१ |
| सरळ लढती | १६ |
| तिहेरी लढती | ४५ |
| महिला उमेदवार | ४३ |

# भारतीय लोकशाही
# जाती मॉडर्न होऊन राजकारणात उतरतात....

मुलाखत : प्रा. गोपालदत्त कुलकर्णी

प्राध्यापकांना फारशी किंमत नसली, तरी त्या व्यवसायाचे काही आनुषंगिक लाभ असतात. पर्क्स म्हणा उदा. बोर्ड मीटिंगा, सेमिनार्स (विचारगोष्टी) सिंपोसियमस् (परिसंवाद), परिषदांना दुसऱ्यांच्या (क्वचितच स्वखर्चाने) खर्चाने जाणे व खाणे इत्यादी. परवा अशाच एका परिषदेला मी पुणे–विद्यापीठात उपस्थित होतो. तिथे कॅनडातून आलेल्या प्रा. होप लीन नावाच्या राज्यशास्त्राच्या एक विदुषी भेटल्या. त्या क्युबेक येथे कुठल्याशा स्कूलमध्ये (कॉलेजपेक्षा प्रसिद्ध शिक्षणसंस्थेला स्कूल म्हणतात.) राज्यशास्त्र शिकवितात. भारताबद्दल त्यांना कुतूहल असल्यानेच त्या एवढ्या ७–८ हजार मैल आल्या होत्या; तेव्हा मी त्यांची एक मुलाखत घेतली. ती येणेप्रमाणे–

**गो द :** भारतातील मौसमी निवडणुकांबद्दल तुमचे काय मत आहे? ह्या निवडणुकांत इंदिरा गांधींचा पक्ष विजयी होईल का?

**हो ली :** वेला इंदिरा गांधींचा पक्ष नऊही राज्यात सत्तेवर येण्यास मला काही अडचण दिसत नाही. (अर्थात् ह्यात मलाही काही अडचण दिसत नव्हती!)

**गो द :** भारतातील लोकशाहीबद्दल तुमचे काय मत आहे ? ती लोकशाही आहे का ?

**हो ली :** का नाही ? ज्याप्रमाणे तुम्ही लोकांनी इंग्लिशची 'इंडिश' केलीत, त्या प्रमाणे सांप्रतची भारतीय लोकशाही. खास भारतीय ढंगाची इंडिमॉक्रसी मानता येईल!

**गोद :** भारतातील लोकशाही जातीयवादामुळे दुबळी झाली असे मानता येईल का ?

**हो ली :** तुम्ही रुडॉल्फचे 'ट्रॅडिशन अँण्ड मॉडर्निटी' वाचले नाहीत वाटते ? त्याप्रमाणे जाती मॉडर्न होऊन राजकारणात उतरणे, विशेष वाईट नाही ! कॅनडात फ्रेंच (मूळचे) व इंग्रज, अमेरिकेत गोरे व काळे, इंग्लंडमध्ये गोरे व सर्व गोरेतर, झिंबाब्वेमध्ये काळे व काळेतर अशी जातीसदृश मतविभागणी होऊन मतदानाबद्दल प्रभाव पडतोच ना !

**गो द :** भारतातील बुद्धिजीवी इंदिरा गांधींना सरसकट विरोध करतात का ? त्याचे कारण तुमच्या दृष्टीने काय असू शकते ?

**हो ली :** तुम्ही भारतीय मनातून एकजात 'नवरे' आहात ! 'मेल शौव्हिनिसम' तसा सर्वच पुरुषात प्रबळ असू शकतो. तेव्हा स्त्रीचे राज्य तुमच्या अंतर्मनात बोचत असावे ! मला वाटते, बऱ्याच पुरुषांचा इंदिरा गांधींवरचा राग पुरुषी असूयेपोटी असावा !


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे


त्यांच्या तोडीचा एकही पुरुष भारतात नसावा हे तुमचे वैषम्य आहे ! खरे का ?

**गो द :** लोकशाही हे लोकांचे, लोकांकडून व लोकांकरिता राज्य असते.

**हो ली :** (मटन मध्येच तोडून) लिंकनची व्याख्या आता जुनी झाली...आणि तुम्हाला आवडत असेल तर लिंकनच्या व्याख्येप्रमाणे तुम्हीच इंदिरा गांधींना निवडून दिलेत. (म्हणजे लोकांचे राज्य अक्षरशः आलेच !) आता त्यांचे पाठीराखे खासदार लोकांनीच निवडून दिले असल्याने शब्दशः तेही खरे आहे ! आता लोकांकरिता म्हणायचे तर जगातले कोणतेच सत्ताधीश लोकांकरिता राज्य चालवीत नसतात !

**गो. द. :** विरोधी पक्षांना त्या दाबून टाकतात...

**हो ली :** १९७७-१९८० पर्यंत जनता व लोकदलांनी काय केले ? त्यांनी कुठे इंदिरा गांधींना तोंड वर करू दिले ? सत्ताधारी किंवा विरोधी पक्षांनी वागण्याच्या काही 'नॉर्मस्' तुमच्या लोकशाहीत रुजलेल्या नाहीत; पण त्या आणखी काही वर्षांनी रूढ होतील.

**गो. द. :** पक्षान्तराबद्दल तुमचे मत काय ?

**हो ली :** हा प्रकार अंमळ अधिकच आहे तुमच्या देशात ! पण त्यातही काही वेडपट शिस्त दिसते ! दलितनेते धावाधाव अधिक करतात. उदा. तुमचे भजनलाल, बाबूजी, शिंदे, दादा रुपवते वगैरे. त्याचे एक कारण असे की, ते स्वतः दलित असले, पुढारी असले तरी ते दलितांचे निरपेक्ष व संपूर्ण नेतृत्व करीत नाहीत. आपल्या जन्मजात गोष्टींचा 'जातिवंत' लाभ उठविण्याचा धडा दलितनेते तुम्हा उच्च जातीयांकडूनच शिकले नाहीत का ?

**गो. द. :** इंदिरा गांधी दलितांचे नेतृत्व करून त्यांचे कल्याण करतील का ?

**हो ली :** कसे विचारता ? त्या अल्पसंख्य जातींच्या पुढाऱ्यांच्या घोळक्यात दिसतात; पण अल्पसंख्य जातींच्या नव्हे ! ब्राह्मण, मुसलमान, दलित यांना हाताशी धरून राज्यकारभार करणे त्यांना सोयीचे व सोपे ठरते. कारण त्यांच्या निष्ठा इंदिरा गांधींना संपूर्ण शरणभावाने मिळतात. कारण अल्पसंख्याकांच्या नेत्यांना बहुमताचा पाठिंबा नसतो, तर बहुमतवाल्या राजकीय पक्षाचा असतो. सतत अस्थिरतेच्या घोंड्यावर उभे केल्यावर पक्षात बंडखोरी कमी होते व झालीच तर ती अल्पसंख्याकांची असल्याने निपटता येते. तुमचा तो बहुगुणा आय काँ. मधून जातो म्हटल्याने 'रिपल' देखील उठली नाही, त्या पक्षात !

**गो. द. :** भारतीय लोकशाहीबद्दल तुम्ही बरेच 'होपफुल' दिसता ?

**हो ली :** (हसून) मला 'होप' आहे; पण मी फूल (मूर्ख) नाही ! कारण लोकशाही म्हणजे तरी काय ? लोकशाही ही लवचिक व प्रवाही संकल्पना आहे. आंदोलने, मोर्चे व शिवराळ लेखन-भाषणे म्हणजे लोकशाही का ? लोकशाही म्हणजे समता व समानसंधी असेल तर जातिसंस्थेत व एकत्र कुटुंबात रमणाऱ्या भारतीयांना ती मनापासून हवी आहे का ? याचाही विचार व्हायला हवा. तुम्हा भारतीयांना 'भांडणगंड' केवढा आहे याचा 'कलोसल' नमुना तुमच्या जनता पार्टीने जगापुढे ठेवला आहे. तुमच्या समाजातील विरोधी पक्षांची एकजूट होण्याची ऐतिहासिक चळवळ किंवा कामगिरी त्या तीन वर्षांतील सत्ताग्रहणामुळे आणखी २५ वर्षे तरी दुरावली आहे व तेच इंदिरा गांधींचे मर्मस्थान व शक्तिस्थानही आहे !

**गो. द. :** (खचलेल्या आवाजात) पण खा. संजय गांधी यांच्या वरचष्म्यामुळे...

**हो. ली. :** मेलेल्या खासदाराच्या बायकोला उत्साहाने तिकिटे वाटणारे तुम्ही आता इंदिरा गांधी व संजय विरुद्ध का चिडता हेच मला कळत नाही ! वतनदारी तुमच्या हाडीमासी खिळलेला ताप आहे. त्या मानाने नेहरूंनी इंदिरा गांधींना कित्येक वर्षे पक्ष व सत्तेवरून दूर ठेवले हीच कौतुकाची बाब आहे. अशी घराणेशाही अमेरिकेनेही एकामागून एक केनेडी डोक्यावर नाचवून दाखविली आहे. इंग्लिश लोकशाहीत तर नाममात्र का होईना, राजेशाही असल्याने 'लेकरूशाही' आपोआपच जोपासली जाते !

**गो. द. :** पण भ्रष्टाचार -- मारुती -- कोर्टात दंगामस्ती हे काय ?

**हो. ली. :** तुझा फर्नांडिस रेल्वेसंप करतो, बडोदा डायनामाइट करतो तेही कोर्टात हुल्लडबाजी करण्याएवढेच ऑब्जेक्शनेबल नाही का ? संख्यात्मक फरक

असेल; पण गुणात्मक नाही! लोकशाहीत जो समंजसपणा व सहिष्णुता हवी ती संजयपाशी वयोमानाने व सत्तास्थानामुळे नसेलही; पण जॉर्जचा तरी वाटाघाटींवर कुठे विश्वास आहे? भ्रष्टाचाराचे तू कशाला विचारतोस? संपूर्ण पृथ्वीचे 'सफरचंद' गाभ्यापर्यंत भ्रष्टाचाराने किडले आहे! भ्रष्टाचाराला रशिया किंवा जपान किंवा अमेरिका हा भेद परवडत नाही!

गो. द. : तुम्ही आर्. एस्. एस्. बद्दल काय ऐकले आहे? तुमचे मत काय त्यांच्याबद्दल?

हो. ली : मला 'सँग' (संघ) माहिती आहे; पण ती एकटीच जातीयवादी संघटना नाही. भारतातील सर्व राजकीय पक्ष कमीअधिक प्रमाणात जातीय संघटना आहेत. पुन्हा जॉर्ज आणि संजयमधल्या फरकासारख्याच! उलट इतर पक्षांप्रमाणे वरवर निधर्मी नाटक केले असते तर संघाची ताकद आहे त्याहून चौपट तरी वाढली असती! पण सपवाले मला 'लोनर्स' वाटतात! एकांडे शिलेदार!

गो. द. : कॅनडात निवडणूककाळात तिकिटांसाठी गर्दी उसळते का?

हो. ली. : का नाही? उसळते! तुमच्या इथे पक्षसुसंघटितपणा १९७७ नंतर बराच कमी झाल्यामुळे गर्दी अधिक उसळत असावी!

गो. द. : भारताने कुटुंब-नियोजनाचे बाबतीत काय धोरण स्वीकारावे?

हो. ली. : 'व्हॉलंटरी कंपल्शनचे' धोरण (ऐच्छिक सक्तीचे) स्वीकारले तर अत्याचार न होता, इच्छित गोष्टी घडून येतील, शिवाय भारताने गेल्या ५-६ वर्षांत लोकसंख्येला थोडाफार आळा घातलाही आहे, तो आशादायक वाटतो.

यणप्रमाणे मुलाखत संपली. त्यांनी माझ्या 'इंटुक' प्रश्नांची नावाप्रमाणे 'होळी' केला. अर्थातच एका परदेशी विदुषीची प्रतिक्रिया म्हणून या भारतीय लोकशाहीच्या उत्तरक्रियेचे थोडेबहुत जरूर महत्त्व आहे. जर संपन्न व तटस्थ कॅनेडियन महिला आमच्याबद्दल निर्धूण आशावादी राहू शकते, तर आपण तरी का निराश व्हावे?

□

# संध्याकाळचे पुणे

# गद्धेपंचविशी व काव्य

**दि. बा. मोकाशी**

मॅजेस्टिक वासंतिक गप्पांच्या पाचव्या दिवशी सायंकाळी साडेसहाला गप्पांना आरंभ होण्यापूर्वी कै. अनंत काणेकर यांना श्रद्धांजली वाहताना, प्रभाकर पाध्ये यांनी काणेकरांचे 'चिरतरुण' असे केलेले वर्णन अगदी तंतोतंत होते. ज्यांनी काणेकरांना पाहिले असेल किंवा बोलताना ऐकले असेल त्यांना ते वर्णन चपखल वाटेल. चालताना, काणेकर चवड्यावर उंच होऊन उसळचा घेत चालत. डोंगरातील तरुण कातकरी आपल्याच जोमात चालावा तसे ते मला नेहमी वाटे. बोलणे सुरू करण्यापूर्वी ते गालात किंचित हसत. त्या हसण्यात छद्मीपणा नसे. मिष्किलपणा असे. ते चांगले उंच होते व त्यांच्या हालचाली मोकळ्या होत्या. आज अमेरिकेहून आलेले तरुण तल्लखपणा दाखवतात तो नकली असतो. काणेकर यांची हालचाल सहज तल्लख होती आणि दुसऱ्याला झटकन जाणून घेण्यातही ते तल्लख होते. त्या वेळी आम्ही गमतीने म्हणत असू की तरुण पिढीच्या दोन लाडक्या गोष्टी आहेत—एक अनंत काणेकर व दुसरे वसंत मासिक! आणि दोघेही का लाडके आहेत हे सांगता येणं कठिण आहे. अनंत काणेकर यांनी त्यांच्या वेळच्या तरुण पिढीला आपल्या वाटतील अशा कल्पना दिल्या असं म्हणता येईल किंवा पाध्ये यांनी सांगितलं तसं,—काणेकर जाणीवपूर्वक कठिण शब्द गाळीत, अलंकार गाळीत असत, लेखनाच्या क्लृप्त्यांपासून ते दूर राहत—हेही त्यांच्या तरुणात प्रिय असण्याचे कारण असेल. कारण काही असो काणेकर म्हातारे झाले तरी तरुण-पिढीचे लेखक राहिले. वाचकांचेच नव्हे तर तरुण कवी व लेखक यांचेही ते आवडते होते.

मी एकदा 'संध्याकाळच्या पुण्यात' सांगितल्याप्रमाणे काणेकरांनी मला माझ्या लेखनाच्या आरंभकाली धक्का दिला; पण तेव्हा त्यांच्यातील व्यवहारी काणेकर नव्या लेखकाला धोक्याची सूचना देत होता इतकेच. लेखनात पैसा नाही म्हणून लेखनात न पडण्याची त्यांची सूचना त्यांनी स्वतःच पाळली नाही. ते मुबईत हिंदुकॉलनीतील पाचव्या गल्लीत राहत असता मी त्यांच्याकडे अधूनमधून जात असे. कदाचित माझ्याशी साहित्याबद्दल बोलण्याजोगे काही नसावे म्हणून ते पुष्कळदा आपल्या मनात असलेल्या दुसऱ्या उद्योगव्यवसायांबद्दल बोलत. कॉलेज सोडून पंप किंवा ऑइल एजिन्सची एजन्सी घ्यावी व खूप पैसा मिळवावा असे काही तरी त्यांच्या डोक्यात असे; पण ते जरी किती असे व्यवहाराचे बोलले तरी ते व्यवहारी होते असे वाटत नाही.

'अनंत काणेकर' या त्यांच्या नावात मात्र जादू होती हे नक्की! ती कशी ते सांगतो. त्या काळचे लेखक म्हणून आपले नाव, उदाहरण देऊन सांगावयाचे तर, 'श्रीयुत दामोदर अप्पाजी रानडे' असे लिहीत. नावाखाली बी. ए. किंवा एम्. ए. (ऑनर्स) असेही असे. (या ऑनर्सचा आम्हाला फार आदर वाटे). या सबंध नाव घालणाऱ्या पिढीनंतर जो पिढी आली ती सबंध नाव न घालता फक्त आद्याक्षरे घाली. जसे श्री. दा. अ.

पृष्ठ २४ वर

# कोर्टात लक्ष्मीनारायण !

संस्कृतच्या अर्धवट ज्ञानामुळे कशा गंमती घडतात, हे दर्शविण्या-करिता आमचे संस्कृत शिक्षक एक श्लोक सांगत—

शिवार्धं रूपयो विष्णुः, विष्णुः रूपयो शिवः।
शिवस्य हृदये विष्णु, विष्णोः हृदये शिवः ॥

श्लोकाचा अर्थ स्पष्ट आहे. शैव वैष्णव वाद ज्या वेळी भरात होता त्या वेळी या वादाचे निरर्थकत्व सिद्ध करण्याकरिता कोण्या कवीने केलेले हे सुभाषित आहे. शिवाचे अर्धेरूप म्हणजे विष्णू, विष्णूचे रूप म्हणजे शिव, शिवाच्या हृदयात विष्णु व विष्णूच्या हृदयात शिव, असा याचा सोपा अर्थ आहे.

पण एक कीर्तनकार या श्लोकावर फार बहारदार गोष्ट रचून सांगत. ' एकदा शिवाचा अर्धा रुपया ( म्हणजे आठ आणे ) विष्णूने घेतले होते, तर विष्णूचा रुपया शिवाने घेतला होता. एकदा शिव नंदीला कडबा आणण्यासाठी बाजारात गेले, तिथे विष्णू भेटले. ते म्हणाले, ' माझे आठ आणे काढ '. त्यावर विष्णू म्हणाले, ' पहिला माझा रुपया दे ' त्यावर दोघांची कडाक्याची जुंपली आणि शेवटी विष्णूच्या उरावर शिव आणि शिवाच्या उरावर विष्णू अशी तुफान हाणामारी झाली. "

प्रत्यक्षात विष्णू आणि शिव एकमेकांच्या उरावर बसले नसतील; पण त्यांचे अनुयायी मात्र अनेक शतके शिया-सुनींच्याहीपेक्षा जास्त कडवेपणाने एकमेकांशी वैर धरीत, वाद करीत, मारामाऱ्या करीत, राजेलोक लढाया करीत, फार काय दुसऱ्या पंथाची मंदिरे पाडून तिथे आपली मंदिरे प्रस्थापित करीत ! शाळेत हे सुभाषित शिकलो त्या वेळी असे वाटले होते, ' एवढा थोर आपला हिंदू धर्म आणि त्याच्या अनुयायांनी या क्षुल्लक गोष्टीसाठी एवढे वाद करावेत ! बरे झाले आपल्या धर्माला काळिमा लावणारी ही वादंगे बंद झाली" पण नुकत्याच वृत्तपत्रात काही बातम्या वाचल्या आणि शैव-वैष्णवच काय पण त्यातल्याही उपपंथात अशाच मारामाऱ्या अद्याप चालू आहेत, फक्त एकमेकांवर चालून जाण्याऐवजी ही मंडळी कोर्टात भांडत रहातात हे समजले आणि धक्काच बसला !

सोलापूरला मारवाडी समाजाचे लक्ष्मीनारायण मंदिर आहे. ( म्हणजे वैष्णव पंथियांचेच ) पण या वैष्णवातही तिंगल आणि वडगल असे दोन उपपंथ आहेत ! मंदिरातील पूजा, गंध, मंत्रोपचार हे या दोन पंथीयांपैकी कोणाच्या पद्धतीनुसार चालावे याबद्दल बऱ्याच वर्षांपासून वाद निर्माण झाला होता. त्यातून निर्णय लागेनासा झाल्यावर १९६४ साली हे प्रकरण कोर्टात गेले. तेथे दोन्ही पंथी-यांना त्यांच्या पद्धतीप्रमाणे पूजाविधी करण्याचा अधिकार आहे, असा निकाल लागला. त्यावरही तिंगल पंथियांनी अपील केले; पण अपिलातही मूळ निकाल कायम झाला !

आता या वेडगळ धर्मनिष्ठेच्या मागे लागून परमेश्वराच्या नावाखाली हजारो रुपये, वेळ आणि श्रम खर्च करणाऱ्या या भक्तांच्या पराक्रमामुळे शरमिंदे व्हावे की, नशीब पूर्वीप्रमाणे एक-मेकांवर तलवारी घेऊन हल्ले न चढवता ही मंडळी कोर्टातच भांडताहेत म्हणून आनंद मानावा ?

दुसरी हकीगत तर त्याहीपेक्षा सुरस आणि चमत्कारिक आहे. तामिळनाडूतील कांचिपुरम् या गावी वरदराजाचे मंदिर आहे. (वैष्णवच) या देवळाच्या हत्तीच्या कपाळावर तिंगल पंथिय गंध लावायचे की, वडगल पद्धतीचे ? हा वाद गेली १० वर्षे सुप्रीम कोर्टा-पर्यंत लढवण्यात आलेला आहे. नुकताच वयाच्या २१ व्या वर्षी हा हत्ती मेला आणि सुप्रीम कोर्टात पडून असलेल्या या खटल्याचा अकाली निकाल लागला. (अर्थात या मेलेल्या हत्तीच्या जागी नवा हत्ती आणण्यात येईल आणि वाद मात्र मरू दिला जाणार नाही हे नक्की.) कदाचित् या क्षुद्र बुद्धीच्या मूर्ख धर्मनिष्ठांच्या सेवेत राहण्याऐवजी मेलेले बरे या विचाराने या तरुण वयाच्या हत्तीने अकाली मरण पत्करले असावे.

आता इतक्या यःकश्चित प्रश्नावरून इतक्या टोकाला वाद नेणे कुणी सुबुद्ध लोक शक्य नाही असे तुमच्याप्रमाणे मलाही वाटत होते; पण एका जाणकार माणसाने यामागची जातीय पार्श्वभूमी सांगितली आणि सर्व काही उलगडा झाला. रामानुज हे वैष्णव पंथाचे महान संत, विचारवंत, धर्मसुधारक आणि मार्गदर्शक होऊन गेले. वैष्णव पंथीयांचे संख्याबल वाढवण्याकरता आणि जात जन्मा-वरून ठरत नाही, कर्तृत्वाने ठरते हे सिद्ध करण्याकरता त्यांनी अनेक अब्राह्मण लोकांना ब्राह्मण्याची दीक्षा दिली. उच्चवर्णीय वडगलांचे मते तिंगल म्हणजे हे असले ' बाटलेले ' ब्राह्मण आहेत. सबब ते कनिष्ठ आणि आम्ही सांगू तीच पूजापद्धती वा ' नाम ' पद्धती इथे चालणार ! ! !

म्हणजे पिढ्यान् पिढ्या ज्यांच्यावर उच्चवर्णाचे संस्कार (अध्ययन, अध्यापन, शास्त्रपारंगतता, शुचिर्भूत आचरण) असूनही यांना वडगल मंडळी बरोबरीचे मानायला तयार नाहीत ! दलितांचे बाबतीत हे काय करतील ?

' वसुधैव कुटुंबकम् आणि अशीच महान महान तत्त्वे असणाऱ्या थोर थोर हिंदूधर्माचा जयजयकार असो !

—डॉ. शरद अभ्यंकर

# निर्मितिक्षम व्यक्तित्व : पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील

राजा मंगळवेढेकर

महाराष्ट्रात गेल्या काही दशकांत जिद्दीने पेटलेली, त्यागाने उठलेली व अवघ्या गोरगरिबांच्या कळवळयाने चेतून निघालेली कर्तृत्ववान माणसे निपजली. त्यांच्या कर्तृत्वाने मराठी मातीत बरेच काही अलौकिक घडले आणि मराठी माणसाचे पाऊल प्रगतीच्या दिशेने पडले. शिक्षण, कला, संस्कृती, समाजकारण, राजकारण, अर्थकारण इत्यादी किती तरी क्षेत्रांत अशी अमोघ करणीची माणसे होऊन गेली आणि त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्रावरच नव्हे तर काही अंशी भारतीय जीवनावरही उमटला !

सहकाराच्या क्षेत्रात, नुकतेच स्वर्गवासी झालेले पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी जे कर्तृत्व करून दाखवले ते अशाच जातकुळीचे आहे. विठ्ठलराव विखे पाटील हे एक विलक्षण रचनाकार निर्मितिक्षम व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी तीन दशकांपूर्वी प्रवर्तित केलेल्या नि उभारलेल्या कामांकडे आणि त्यांच्या कामापासून प्रेरणा घेऊन उभ्या झालेल्या, फैलावलेल्या वटवृक्षासारख्या कार्याकडे पाहिले म्हणजे त्यांच्या ठायीच्या निर्मितिक्षमतेची यथार्थ कल्पना येते !

लोणीसारख्या एका हजार–बाराशे वस्तीच्या खेडेगावात, गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म घेतलेला हा किसानपुत्र संस्काराच्या शिदोरीवरच वाढला व अनुभवाच्या शाळेतच शिकला. पुस्तकी शालेय शिक्षण तसे नाममात्रच; पण उघड्या जगात वावरताना हरघडी शिकतच गेला ! विठ्ठलरावांच्या व्यक्तिमत्त्वात अशी वैशिष्ट्ये सहज दिसून येतात. शालेय शिक्षण पूर्णतया झाले नव्हते तरी पोथी–पुस्तकांची संगत त्यांनी कधी सोडली नव्हती आणि पोथी–पुराणांचे व्रत आचरतानासुद्धा त्यांचे मन किंवा विचार हे पोथीबंद झालेले नव्हते. कालच्या पिढीतले असूनही आजच्या कालमानाचे भान त्यांनी राखले होते. पोथीतली सर्वभूती समता, करुणा, बंधुभावना व 'एकमेकां साह्य करू' ही शिकवण त्यांनी आत्मसात केली होती; पण पोथीत साखरेची गिरणी नाही, म्हणून काही त्यांचे अडले नाही. जुन्या धार्मिक श्रद्धेला नव्या तंत्र–विज्ञानाची त्यांनी जोड दिली आणि नगर जिल्ह्यातल्या लोणीजवळच्या ओसाड, भकास माळावर शेतकऱ्यांच्या सहकारातून प्रवरानगरची उद्योगनगरी उभारली !

विठ्ठलराव स्वतः हाडाचे शेतकरी होतेच. तरुणपणी आदर्श शेती करून त्यांनी शेतीचे वस्तुपाठ ग्रामीण जनतेला दिले होतेच; पण ह्या शेतकऱ्यांची पिढ्यान्‌पिढ्यांची दैन्यावस्था, शोषण, दारिद्र्य पाहून ते बेचैन, अस्वस्थही झालेले होते. या अस्वस्थतेतूनच सहकाराचा मार्ग त्यांनी धरला होता. कष्टकरी शेतकऱ्यांविषयी असीम जिव्हाळा, परम आस्था व करुणा हेच विठ्ठलरावांच्या कर्तृत्व प्रेरणेमागील मूलस्रोत आहेत.

विठ्ठलरावांच्या ठायीच्या प्रेरणेचा मागोवा घेताना असे लक्षात येते की, त्यांच्या कर्तृत्वशक्तीच्या आविष्कारालाही त्यांच्या जन्मकाळची, बाल व तरुणपणची परिस्थिती देखील निमित्त ठरलेली आहे. विठ्ठलरावांचा जन्म आहे २९ ऑगस्ट १९०१–नारळी पौर्णिमेचा. त्या सुमारास, त्यापूर्वी आणि त्यानंतरही पंचवीस–तीस वर्षे नगरजिल्ह्यातला बराचसा भाग दुष्काळी प्रदेश म्हणूनच मानला जात होता शेती हाच प्रमुख व्यवसाय. सुमारे ७२ टक्के लोक शेतीच्या धंद्यातच गढलेले. उपलब्ध रोजगारापैकी७१–७२ टक्के रोजगार देखील शेतीव्यवसायाशीच निगडित.त्यामुळे शेती हीच तारणारी व तीच मारणारी अशी स्थिती होती. आजही थोडेफार असेच आहे. नगर जिल्ह्यातल्या भागात पाऊसमान बेताचे व बेभरवशाचे. त्यामुळे दर तीनचार वर्षांनी दुष्काळ ठेवलेलाच ! दुष्काळांमुळे शेतकरी अगदी निस्त्राण झाला होता. शेती–सावकाराच्या ताब्यात गेलेली होती. व्यापारी–दलालही त्यांचे शोषण करीत होतेच. सावकारांच्या गांजणुकीने शेतकरीवर्ग एवढा पीडलेला होता, की त्यातून विजेची ठिणगी पडली आणि १८७६–७७ च्या सुमारास सावकाराच्या जाचाविरुद्ध काही ठिकाणी 'शेतकऱ्यांची बंडे !' झाली. दख्खनचे दंगे–Deccan Riots म्हणून आता ते इतिहासात नोंदलेले आहेत.



"गुरे कडब्याच्या किंमतीस विकू लागली आणि कडबा सोन्याच्या भावाने जात चालला आहे." अशी स्थिती १८९६ सालच्या दुष्काळाच्या वेळी–'केसरी' ने वर्णन केलेली होती !

ब्रिटिशांनी शेतकऱ्यांची बंडे मोडली; पण दुष्काळामुळे धुमसणाऱ्या असंतोषाचीही दखल घेतली होती. कारण त्यांना इथली सत्ता टिकवायची होती. म्हणून त्यांनी भंडारदऱ्याचे धरण, दुष्काळी काम म्हणूनच बांधले. त्याचे पाणी १९२१–२२ च्या सुमारास ओझर, लोणी, बेल्लापूर आदी भागातून पाटाने वाहू लागले; पण पारंपारिक शेतीव्यवसायात गुंतलेल्या शेतकऱ्यांना पाण्याचा उपयोग करण्याचेही त्राण उरलेले नव्हते.

धरण बांधण्यासाठी केलेला खर्च वसूल व्हावा या हेतूने ब्रिटिश सरकारने बेलापूरजवळची भरपूर जमीन व मुबलक पाणी देऊन युरोपीय ब्रॅडी आणि कंपनीला साखरकारखाना काढण्यासाठी उत्तेजन दिले. १९३२ च्या साखरधंद्याला संरक्षण देण्याच्या सरकारी निर्णयामुळे महाराष्ट्रात १९४० पर्यंत सुमारे १४ खाजगी साखरकारखाने उभे राहिले. त्यातील ६ साखरकारखाने एका नगर जिल्ह्यातच निघाले होते आणि गांजलेल्या पीडलेल्या शेतकऱ्यांकडून




कोलगेट टूथ पावडरने
तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे
संरक्षण करा —
श्वास दुर्गंधीही थांबवा!


कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हलुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटीत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.

TP.G.30 MR

एकरी फक्त ५–७ रुपये प्रमाणे ४०–५० वर्षांच्या दीर्घ मुदतीने जमिनी खंडाने घेतल्या. शेतमालक शेतकरी आपल्याच जमिनीत शेतमजूर म्हणून राबू लागला आणि त्याच्या जमिनीतल्या उसाची साखर करून खाजगी कारखानदार मात्र गब्बर बनले!

निसर्गाची अस्मानी आणि सावकार-व्यापाऱ्यांची सुलतानी यांच्या जोडीला आता खाजगी कारखानदारी शेतकऱ्यांचे शोषण करू लागली.

कळत्या-सवरत्या वयापासून हे सर्व स्थित्यंतर विठ्ठलरावांनी अगदी जवळून निरखिलेले होते. शेतकऱ्यांची दैना पाहिलेली होती, अनुभवलेली होती. ते अस्वस्थ बनले, 'बुडती हे जन देखवेना डोळा' अशीच काहीशी स्थिती झाली आणि यातून बुडालेल्या शेतकऱ्याला वर काढायचे तर सहकाराशिवाय तरणोपाय नाही, हे त्यांनी पक्के जाणले.

सहकारी मार्गाची आणि विठ्ठलरावांची ओळख तशी त्यांच्या पंचविशीतच झालेली होती. विठ्ठलरावांच्या जन्मकाळीच भारतातल्या सहकारी चळवळीची हालचाल सुरू झालेली होती आणि १९०४ सालीच 'हिंदुस्तान क्रेडिट सोसायटीज् अॅक्ट' प्रथमतः पास झाला होता. आपल्या भावी जीवनात सहकाराचे एवढे प्रचंड कार्य करणाऱ्या विठ्ठलरावांचा आणि भारतातल्या सहकारी चळवळीचा पाळणा असा एकाच सुमारास हलावा, हा नियतीचा नेमही वैशिष्ट्यपूर्ण वाटतो!

विठ्ठलरावांच्या घराण्यात त्यांच्या आधीपासूनच विठ्ठलभक्ती होती. पंढरीची वारी होती. घरात नित्यनेमाने पोथीपुराण चाले. लहानगा विठ्ठलही ते लक्षपूर्वक ऐकत असे. शाळा बुडवून, मोरीत लपून बसून ऐकत असे. लहानपणी आवडलेली पोथी विठ्ठलराव परवा–परवापर्यंत नेमाने ऐकत होते. पोथीश्रवणामुळे आणि घरातल्या धार्मिक वातावरणामुळे विठ्ठलरावांच्या बालमनावर श्रद्धेचे संस्कार सहजच घडले नि ते चांगले दृढ झाले की त्यांच्या बाबतीत पुराणातली वांगी पुराणातच राहिली नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीत त्याच वेळी दिसू लागली. पुढे तर दिसलीच! पोथीतली समता विठ्ठलरावांच्या आचरणात आली. स्पृश्यास्पृश्यभेद, रूढींची जळमटे त्यांनी तरुणपणीच झटकली होती. विठ्ठलरावांनीही पुणतांब्याला जाऊन चांगदेवाच्या समाधीवर तुळशीची माळ ठेवून आपल्या गळ्यात धारण केली होती. पंढरी आणि गांडगापूरची वारी धरली होती, वारकरीपंथाची, भागवतधर्माची, निखळ माणुसकीची, मानवधर्माची, अध्यात्मिक लोकशाहीची मर्मखूण त्यांना जशी उमगलेली होती, तशीच दत्तगुरूंची जे जे भले, चांगले, ते ते तिथून घ्यावे, शिकावे ही शिकवणूक आत्मसात केली होती.

विठ्ठलरावांच्या लोणी गावची 'लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी' ही संस्था १९२६ च्या मंदीच्या काळात चांगलीच डबघाईला आली होती आणि शेतकऱ्यांचा दुबळा आधारही मोडण्याच्या बेतात होता. विठ्ठलराव आपल्या गावातील तरुण सहकारी मित्रांसह पुढे सरसावले आणि त्यांनी ह्या सोसायटीच्या कारभारात लक्ष घातले आणि त्या खडतर काळातही सोसायटीचे तारू सुखरूपपणे हाकले. त्यांनी त्या काळापासूनच सोसायटीला नेहमी 'अ' वर्ग मिळवून दिला. सर्वांच्या सलोख्यासाठी सगळ्यांकडून त्यांनी सोसायटीचा कारभार चालवून

घेतला. विठ्ठलराव स्वत: कधीही चेअरमन किंवा कसल्याही अधिकार-पदावर राहिले नाहीत ! लोणीच नव्हे तर आसपासच्या परिसरातील खेड्यापाड्यांतही सोसायट्या काढण्यात व त्या यशस्वीपणे चालविण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

सोसायटीचे कामात लक्ष घालत असतानाच गावकीच्या कामातही ते लक्ष पुरवीत होते. गावातील तंटेबखेडे मिटवीत होते.जत्रेच्या वेळी विधायक वळण देत होते, दारू पिऊ नका, कमी खर्चात लग्नकार्य करा, अस्पृश्यता पाळू नका– असा हिताचा विचार पटवून देत होते. केवळ तोंडाने नव्हे तर कृतीनेही ! विठ्ठलरावांनी आपल्या मुलींच्या लग्नात हुंडा दिला नाही की मुलांच्या लग्नात घेतला नाही ! केवळ सोडा–लेमनवर गोरगरिबांची लग्ने लावून दिली. जेवणावळीच्या व्यर्थ खर्चाला चाट दिली. चाळीस–पंचेचाळीस वर्षांपूर्वीचा काळ आणि खेड्यातल्या मंडळींच्या खरी गरज, समजुती यांचा विचार केला म्हणजे विठ्ठलरावांच्या कार्याचे महत्त्व लक्षात येईल. त्यांना या कामी विरोध झाला नाही, असे नाही; झालाच. वृद्धांनी पायरी सोडून वागायचे नाही म्हणून बजावले, आप्तांनी खुळ्यात काढले, पण विठ्ठलरावांनी निर्धाराने धरलेली वाट सोडली नाही. यातूनच विरोध मंदावला, मावळला आणि नेतृत्व चालत आले. सोसायटी काय किंवा गावकीचा कारभार काय, विठ्ठलरावांच्या सहकारी कार्याचा ओनामा झालेला होता. सहकारी विचार व मार्ग यावरील त्यांची श्रद्धा दृढावत होती.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपले. पडझडीतून पुनश्च मांडामांड सुरू झाली. युद्धाच्या होळीवर आपली पोळी भाजून घेणारे भांडवलदार, व्यापारी जवळ आलेल्या पैशातून नवे साखरकारखाने उभारणीच्या तयारीला लागले. विठ्ठलरावांना शेतकऱ्यांची दैना दिसू लागली. त्यांनी मनाशी विचार पक्का केला की, भांडवलदारांना शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने व खरेदीने मिळू द्यायच्या नाहीत ! खाजगी कारखान्यांची गुलामी पत्करायची नाही !

१७ डिसेंबर १९४५. बेलापूररोडला 'दि डेक्कन कॅनॉल्स बागाइतदार परिषद' भरली. डॉ. धनंजयराव गाडगीळ अध्यक्ष होते. विठ्ठलराव आपल्या भागातली शेतकरीसेना घेऊनच आले होते. सहकारी साखरकारखान्याची हवा पसरली होती. डॉ. गाडगिळांच्यासारखा सहकारी मार्गाचा, आंतरराष्ट्रीय कीर्तीचा अर्थशास्त्रज्ञ पुरस्कर्ता अध्यक्षपदी होता. म्हणून या ठरावाला विरोध न करता पुढे पैशाच्या बळावर हा सहकारी कारखानाही कसा आपलाच होईल ते पाहू अशी भूमिका बड्या बागायतदारांनी व भांडवलदारांनी घेतली होती. ठराव आला. या वेळी विठ्ठलरावांनी अत्यंत दक्षतेने व व्यवहारचातुर्याने त्यात दुरुस्ती सुचविली व तिच्यासह ठराव पास करून घेतला. दुरुस्ती अशी होती की, 'ज्या भागात कारखाना काढावयाचा त्या सहकारी साखरकारखान्याचे शेअर्स तेथील 'खुद्द खातेदार' असणाऱ्या शेतकऱ्यालाच घेता येतील. इतरांना नाही !'

विठ्ठलरावांच्या दुरुस्तीमधील 'खुद्द खातेदार' या शब्दांनीच भांडवलदारांचे मनचे मांडे मनात राहिले. कारण त्यांची जमीन नियोजित सहकारी कारखान्याच्या परिसरात नव्हती. म्हणजे ते खुद्द खातेदार नव्हते आणि यापुढे जमीन घेऊन खातेदार बनणे, विठ्ठलरावांनी केलेल्या शेतकऱ्यांमधील जागृतीमुळे व एकजुटीमुळे अशक्य झाले होते. भांडवलदारी कारवायांवर विठ्ठलरावांनी अशी त्या वेळी मात केली आणि ऊस-उत्पादक अर्धा एकर, एक एकर, दोन एकर अशा लहान लहान शेतकऱ्याला देखील सहकाराच्या मार्गाने साखरेच्या कारखान्याचे मालक बनविले !

खरोखर डॉ. धनंजयराव गाडगीळ व विठ्ठलराव विखे पाटील यांची या संदर्भात ज्या वेळी गाठभेट झाली तो क्षण महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने 'भाग्यक्षण' होता असेच म्हटले पाहिजे ! भारतात आज अनेक सहकारी साखरकारखाने आहेत, त्यात ५९ महाराष्ट्रात साखरनिर्मिती करीत आहेत, १५–१६ उभारणीच्या अवस्थेत आहेत. आज सहकारी साखरकारखाना काढायचा ही काही फार अवघड किंवा पराक्रमाची बाब राहिलेली नाही. कारण त्याचे फायदे गेल्या ३० वर्षांत शेतकऱ्यांनाही कळून आलेले आहेत; पण विठ्ठलरावांनी जेव्हा आपलाच सहकारी साखरकारखाना काढायचे ठरवले त्या वेळची १९४६–५० ची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती.

अडाणी शेतकरी कारखाना काढणार ही कल्पना तत्कालीन स्वदेशी सरकारलाच जिथं पटत नव्हती तिथं खेड्यातल्या निरक्षर शेतकऱ्याला तरी ती कशी पटावी ? म्हणून भाग-भांडवल जमवताना विठ्ठलराव जेव्हा आपल्या घोडीवर बसून नि खिशात चटणी-भाकरीची पुरचुंडी ठेवून रस्ते नसलेल्या खेड्यापाड्यांतून हिंडत असत त्या वेळी केवढा विरोध व केवढी अवहेलना त्यांना सहन करावी लागली ! बुजुर्ग शेतकऱ्यांना विश्वास नव्हता आणि असा कारखाना निघाला तर आपली सद्दी संपणार अशा भीतीने गांगरलेले मतलबी गूळव्यापारी त्यांना चिथावूनही देत होते. 'पागोटेवाला काय कारखाना काढणार ? त्याला काय कळतंय त्यातलं ?' असे कुणी म्हणत, तर खेड्यात पाऊल घालताच, 'हे आले लुटारू !' अशा शब्दांत कुणी स्वागत करी. खुळे, बावळे, वेडपट अशा शब्दांनी थट्टा होई. कुणी दारही लावून घेई, कुणी तोंड चुकवी, कुणी रानीवनी निघून जाई. बेलापूरच्या व्यापाऱ्यांनी तर 'खुळा आला, वेडा आला' असे ओरडत टग्या पोरांचे टोळकेच विठ्ठलरावांच्या मागे सोडले होते !

पण अशा विरोधातूनही विठ्ठलरावांनी आपल्या शेतकरी बांधवांना त्यांच्या हिताच्या गोष्टी सांगून पटवले. त्यांना अज्ञानाच्या झोपेतून उठवले. मग मायबहिणींनीही अंगावरचे डाग विकून, गहाण ठेवून

शेअर्सचे पैसे विठ्ठलरावांच्या स्वाधीन केले. कारखाना उभारीत असताना बॉयलर इन्स्पेक्टर, आर. टी. ओ. कडची माणसे, पोलीस मुद्दाम अडवणूक करीत. लाच मागत; पण विठ्ठलराव सांगत, 'घामाचा पै-पैसा शेतकऱ्यांनी विश्वासानं माझ्या हवाली केलाय. त्यातला तांबडा पैसा सुद्धा देणार नाही!' अनेक अडचणींचे डोंगर पार केले तेव्हा कुठे ३१ डिसेंबर १९५० रोजी विठ्ठलरावांच्या पहिल्यावहिल्या सहकारी कारखान्यातून साखरेचे पहिले पोते बाहेर पडले!

ऊस-उत्पादक शेतकऱ्यांचा पहिला 'प्रवरा सहकारी साखर-कारखाना' सुरू झाला आणि सहकारी क्षेत्रातच नव्हे तर शासकीय धोरणातही क्रांतिकारी बदल घडून आला. प्रवरेचे यश यातून पंचवार्षिक योजनेच्या नियोजनकारांनी साखरनिर्मितीसाठी केवळ सहकारी प्रयत्नांनाच प्राधान्य देण्याचे ठरवले. देशाच्या अर्थव्यवस्थेवर एवढा प्रभाव पाडणारे कार्य धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव आणि त्यांचे सहकारी यांनी केले.

प्रवरेचा कारखाना उभा करीत असताना आणि नंतरही शेतकऱ्यांचे हित–सदैव डोळ्यांपुढे ठेवून जिथे व जेवढी बचत करता येईल तिथे ती केली. कारखान्याच्या कामासाठी पुणे–मुंबई अशा वाऱ्या विठ्ठलरावांना कराव्या लागल्या. त्यात ७–८ हजार रुपये खर्च झाले; पण ते सर्व विठ्ठलरावांनी स्वतःच्या खिशातून केले. खिशात भाकरीची पुरचुंडी घर सोडतानाच ठेवलेली असायची. या तीस वर्षांत प्रवरा कारखान्यावर गेस्ट हाउसमध्ये विठ्ठलराव कधीही जेवलेले नाहीत! संचालक मंडळीच्या बैठकी किंवा जनरल बॉडीची मीटिंग या वेळी कमीत कमी खर्च ते करीत असत. कारखान्याच्या पहिल्या सर्वसाधारण सभेचा खर्च फक्त एक रुपया झालेला आहे!

कारखाना उभारला; शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हळूहळू सुधारू लागली; पण हे आर्थिक मागासलेपण केवळ हटवून भागणार नाही, तर शैक्षणिक मागासलेपणही घालवले पाहिजे असा विचार करून त्याच वेळी विठ्ठलरावांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना पाचारण केले आणि शैक्षणिक प्रकल्पही हाती घेतले. त्यातही स्त्रियांच्या उन्नतीचा विचार केला नि मुलींच्या शिक्षणाचीही सोय केली. त्यांच्यासाठी वसतिगृहे उभारली. शिष्यवृत्त्या ठेवल्या. शेतकऱ्यांची मुले बाहेरच्या मुलांशी स्पर्धेत टिकावी, म्हणून इंग्रजी माध्यमाचे 'प्रवरा पब्लिक स्कूल' उभारले. ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्यासाठी 'प्रवरा हॉस्पिटल' सुरू केले...अशी किती तरी जनहिताची कामे त्यांनी आयुष्यभर केली. त्यांच्या कार्यातून अनेकांनी स्फूर्ती–प्रेरणा घेतली आणि आपआपल्या भागात सहकारी प्रकल्प उभे केले! म्हणूनच विठ्ठलरावांना भारतातील सहकारी साखरकारखानदारीचे एक आद्य जनक म्हणून गौरविले जाते. राष्ट्रपतींनी १९६१ साली 'पद्मश्री' किताब देऊन त्यांचा गौरव केला होता; पण असंख्य लोकांच्या हृदयात निरलस सेवा-कार्यामुळे त्यांना जे स्थान प्राप्त झाले होते ते अजोड होय. 'ग्रामीण नेतृत्व' कसे असते किंवा असावे या प्रश्नाचे उत्तर आहे 'पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील –'

एक 'ग्रामीण प्रबोधनकार' म्हणून त्यांची दखल महाराष्ट्राच्या इतिहासाला घ्यावी लागेल!

आयुष्यभर जनहिताची दिंडी वाहून वाहून थकलेला हा कार्यकर्ता वारकरी दि. २० एप्रिल ८० रोजी वैकुंठास गेला!

भागलासी मायबापा।
बहुश्रम केल्या खेपा॥

□


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पूर्वांचलाचे आव्हान । लेखांक तिसरा

# आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या नागभूमीत ही संपन्नता, ही चैन ही उधळपट्टी आली कुठून ?

विनय सहस्रबुद्धे

आसामातील सिल्चरहून निघून बदरपूर आणि लुंबडिंगमार्गे मी दीमापूरला येऊन पोहोचलो तेव्हा सकाळचे सहा वाजले होते. वेळ भल्या सकाळची असतानाही आकाशात क्षितिजापासून बराच वर तळपणारा सूर्य आपण भारताच्या अतिपूर्वेकडील प्रांतात आहोत याची जाणीव करून देत होता.

दीमापूर हे नागभूमीतील सर्वांत मोठे शहर आणि व्यापारी केंद्र या प्रांताचं प्रवेशद्वार आहे. संपूर्ण प्रांतात दीमापूर हेच एक रेल्वे-स्टेशन असून ईशान्य–सीमा रेल्वेनं हे ठिकाण थेट आसामच्या पश्चिम सीमेशी जोडलेलं आहे. नागभूमीत एकुलता एक विमानतळ आहे तो ही दीमापुरातच. अखंड आसामातील नागाहिल्सचा हा जिल्हा १९६३ मध्ये वेगळा काढून त्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्यात आला तेव्हा नागानेत्यांनी दीमापूरचा नागभूमीत समावेश व्हावा यासाठी हट्टाग्रही भूमिका घेतली व अखेर नागांपेक्षा इतरे जनांचीच वस्ती अधिक असलेलं हे विकसित शहर नागभूमीचा भाग बनलं.

भारताच्या ईशान्य भागातील नागभूमी व अन्य राज्यांतील लोक-जीवनाबाबत आपल्या चित्र–विचित्र कल्पना असतात. दीमापुरात पाऊल ठेवताना माझ्याही मनात त्या होत्याच. त्यामुळे डोक्यावर पिसे आणि रंगीबेरंगी काठ्यांचे टोप घातलेले, वल्कलांसारखी वस्त्रे नेसलेले आणि हातात तीरकामठा किंवा अन्य धारदार शस्त्र घेतलेले नागा सर्वत्र दिसतील अशी माझी कल्पना होती. प्रत्यक्षात दीमा-पुरात मात्र असे, अस्सल निसर्ग–जीवन जगणारे नागा औषधालाही नाहीत ! ह्या व्यापारी शहरात मारवाडी आणि गुजराती व्यापारी मोठ्या संख्येने आहेत. बंगाली, असमिया आणि नेपाळ्यांची संख्याही बरीच मोठी आहे. दीमापूरचा नागभूमीत समावेश झाल्यावर नागांची संख्याही बरीच वाढली आहे; पण हे नागालोक मोन किंवा तुएनसंग भागातील नागांपेक्षा अधिक Sophisticated आहेत. एक मंगोलियन चेहरेपट्टी सोडली तर दीमापुरातील नागा वेशभूषा व सर्वसाधारण जीवनपद्धतीच्या बाबतीत या शहरातील अन्य नाग-रिकांपेक्षा वेगळे नाहीत.

१६,४८७ चौ. कि. मी. क्षेत्रफळाच्या नागभूमी राज्याची लोक-संख्या आहे अवघी साडेपाच लाख ! मोन, तुएनसंग, मोकोकचुंग, वोखा, कोहिमा आणि फेक व झुन्हे बोटो हे नागभूमीतील सात जिल्हे असून एकूण १४ प्रमुख जमातींचे नागा लोक या प्रदेशात राहतात.

कोहिमा ही नागभूमीची राजधानी असून दीमापूर ते कोहिमा हे ७४ कि. मी. चं अंतर तोडायला सरकारी महामंडळाच्या बसला तब्बल साडेतीन तास लागतात ! गौहाती–शिलाँग प्रवासाची आठवण करून देणारा असा हाही वळणावळणांचाच मार्ग असला तरी ही वळणे अधिक धोकादायक आहेत. या भागातील फिरेमा नदीच्या वळणांना चुकवत चुकवत अक्षरशः एका डोंगरमाथ्यावरून दुसऱ्या डोंगरमाथ्यावर असाच हा प्रवास आहे. राजधानी कोहिमा समुद्र-सपाटीपासून १४४४ मीटर्स उंचीवर आहे. त्यामुळे अनेकदा उंच डोंगरमाथ्यावर आपला प्रवास सुरू असताना ढग मात्र खाली दरीत लुडबुडताना दिसतात.

संपूर्ण नागभूमीला मध्यवर्ती नसतानाही या राज्याची राजधानी कोहिमासारख्या दुर्गम आणि पहाडी शहरात का आहे हे एक कोडंच

आहे ! उभ्या शहरात अर्ध्या चौरस मैलाचीही सपाट जमीन आढळणार नाही ! अनेक ठिकाणी घराचं पुढचं दार काहीशा सपाट रस्त्यावर उघडतं तर मागचं दार बऱ्यापैकी खोल दरीत ! मंत्र्यांचे बंगले आणि राजभवन इत्यादीसुद्धा असेच एकेका टेकडीच्या माथ्यावर आहे. त्यामुळे गव्हर्नर्स हिल, चीफमिनिस्टर्स हिल अशी टेकड्यांची नामकारणे झाली आहेत.

दहा हजारांहूनही कमी लोकसंख्येच्या कोहिमा शहरातही नागा बहुसंख्य असले तरी मणिपुरी, असमिया आणि बंगाली मारवाड्यांची संख्याही कमी नाही. उत्तरप्रदेशी भय्ये व नेपाळी गुरख्यांची संख्याही दुर्लक्षणीय नाही. विलोभनीय निसर्गसौंदर्यानं नटलेल्या या शहरात एके काळी नागा टोळ्यांच्या हालचालींच्या सुसूत्रीकरणाचं प्रमुख केंद्र होतं असं सांगितलं जातं. शहरातील सर्व नागा नागरिक सामान्यपणे ख्रिश्चन झालेले आहेत. त्यामुळेच या शहराच्या वातावरणात आधुनिकतेच्या, पाश्चात्य वातावरणाच्या खाणाखुणा ठायी ठायी दिसून येतात. अख्ख्या कोहिमा शहरात मंदिरांपेक्षा चर्च अधिक आहेत. साध्या उपहारगृहांपेक्षा मद्यालयांची संख्या अधिक आहे ! या भागात मुळातच थंड हवामान, त्यात कोहिमा हे उंचावरचं ठिकाण, त्यामुळे थंडीचा कडाका चांगलाच जाणवतो. परिणामतः काळ्या–तांबड्या चट्टेपट्टेरी नागा–शाली पांघरलेले नागा तरुण–तरुणी थंडीच्या दिवसांत मद्यालयांमध्ये गर्दी करताना दिसले तर नवल नाही. उभ्या पूर्वांचलात सर्वत्र या नागा–शाली प्रसिद्ध आहेत. काळ्या पार्श्वभूमीवर तांबडे पट्टे असलेल्या या शालींवर मधूनच नागांची परंपरागत चित्रे छापलेली असतात. अस्सल लोकरीच्या या आकर्षक शालीची किंमत खुद्द नागभूमीतही शंभर–सव्वाशेपेक्षा कमी नाही.

नागभूमीत प्रमुख अशा लहान–मोठ्या १४ जमाती आहेत व त्यांपैकी आओ आणि अंगामी या त्यातल्या त्यात पुढारलेल्या जमाती आहेत. मोन आणि तुएनसंग ह्या जिल्ह्यांचा प्रदेश सर्वाधिक मागासलेला असून आपण चित्रांत पाहतो तसे, पिसाचा टोप घालून नाच करणारे उग्र चेहऱ्यांचे शस्त्रधारी नागा आज याच भागात दिसतात. या दोन जिल्ह्यांबरोबरच मोकोकचुंग भागातही दारिद्र्य आणि मागासलेपणाचं राज्य आहे. कोहिमासारख्या शहरात आधुनिकतेचं वारं प्यालेले सुशिक्षित नागा, मद्यालयातून पैशांची उधळण करताना दिसतात तर मोनसारख्या मागास प्रदेशातील नागा अक्षरशः गाई आणि डुकरांना मारून, त्यांना कापून टांगून ठेवतात आणि दिवसेंदिवस वाळणारं त्यांचं मांस शेकोटीत भाजून खातात आणि दिवस काढतात. अर्थात जाती–जमातींमधील भिन्नता वेशभूषा किंवा आर्थिक स्थितीपुरतीच मर्यादित नाही. या भागातील विवेकानंदकेंद्राचा एक जीवन–व्रती भास्कर शेट्टी यानं जवळजवळ अवघा नागालँड पालथा घातला आहे; त्याच्या सांगण्यानुसार या दुर्गम प्रदेशात दर तीन मैलाला भाषा बदलते, खाण्यापिण्याचे प्रकारही बदलतात. भास्कर शेट्टी या अवघ्या पंचविशीच्या वेडर युवकानं आपल्या भ्रमंतीत या विविधतेचं कारणही हुडकून काढलं. 'वर्षानुवर्षं या दुर्गम प्रदेशात एक जमात दुसऱ्या जमातीपासून अलिप्त रहात गेल्याने जमाती–जमातींच्या संस्कृती परस्परात मिसळलेल्या नाहीत व त्यामुळेच एकेका जमातीचं एकेक विश्व निर्माण झालं', असं भास्करचं मत आहे.

ईशान्य भारतातील जवळजवळ सर्वच पहाडी प्रांतांप्रमाणे नागभूमी हेही आर्थिकदृष्ट्या अतिशय मागासलेलं राज्य आहे. कोहिमातल्याच एका पत्रकारानं पुरविलेल्या माहितीनुसार, नागभूमीत खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयात ७० पैसे केंद्रसरकारचे असतात, यावरून या प्रदेशाचं परावलंबित्व लक्षात यावं. कागदाचे छोटेमोठे कारखाने सोडले तर नागभूमीत स्वतःचं असं औद्योगिक उत्पादन फारसं नाही. हातमागाचा धंदा बऱ्यापैकी चालतो. मणिपुरी व नागा नक्षीकामाच्या सुती शालींना इतरत्र मागणीही चांगली आहे; पण या व्यवसायाच्या विकासाचे प्रयत्न झालेले नाहीत. मका आणि ऊस, बटाटे व कॉफी ही या भागातील काही पिकं आहेत. तांदुळाच्या उत्पादनाचं प्रमाणही चांगलं आहे.

## चालू राजकारण

नागभूमीत आज श्री. ए. सी. जमीर यांच्या नेतृत्वाखाली नव्यानंच सत्तेवर आलेल्या आघाडीच्या सरकारचं राज्य आहे. याआधी युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट या पक्षाचे मुख्यमंत्री विझोल यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात होतं. इंदिरा कॉंग्रेसनेत्यांच्या प्रोत्साहनानं झालेल्या पक्षान्तरातून ही खांदेपालट झालेली असली तरी त्यामागे मोठी राजकीय चाल आहे व तिचा तपशील पाहण्यासारखा आहे.

या ना त्या प्रादेशिक पक्षाचे नेते अनुक्रमे श्री. टी. एन. अंगामी, होकशे, सेमा, जासोकी, शिलू, विझोल या पाच जणांनंतर नागभूमीत सत्तेची सूत्रे हाती घेणारे श्री. जमीर हे सहावे मुख्यमंत्री आहेत. राज्याच्या राजकारणात आत्तापर्यन्त नेहमी अंगामी व आओ जमातींचे वर्चस्व रहात आले आहे. श्री. शिलू व आत्ताचे मुख्यमंत्री जमीर हे उभयता आओ आहेत, अन्य सर्व अंगामी होते. ४९ वर्षे वयाचे श्री. जमीर हे युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंटचे संस्थापक आहेत. तसेच मुख्यमंत्रिपदावर येण्यापूर्वी पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळात सांसदीय सचिव म्हणून तर इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळात उपमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

१९७४ मध्ये यु. डे. फ्रंटला बहुमत मिळाल्यानंतर राज्याचे अर्थमंत्री म्हणून श्री. जमीर नागभूमीच्या राजकारणात परतले. पुढे १९७७ मध्येही त्यांच्या पक्षाला बहुमत मिळून मुख्यमंत्री विझोल यांच्या मंत्रिमंडळात ते उपमुख्यमंत्री झाले; परंतु अनपेक्षितपणे गेल्या सप्टेंबर–ऑक्टोबरमध्येच आपले ज्येष्ठ सहकारी श्री. जमीर यांना काढून टाकण्याची पाळी मुख्यमंत्री विझोल यांच्यावर आली. त्याचं असं झालं की, गेल्या सप्टेंबरमध्ये काळजीवाहू चरणसिंग सरकारच्या कारकीर्दीत मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री वीरेन्द्रकुमार सकलेचा यांचशवरील, नेपाळात संपत्ती दडविल्याच्या आरोपाच्या चौकशीसाठी सी. बी. आय. चे अधिकारी काठमांडूस गेले होते. नेपाळ सरकार व तिथल्या बँकांमध्ये कसून तपास करूनही सकलेचांवरील आरोपाला आधार सापडला नाही; पण ह्या शोध घेताना अचानकपणे उजेडात आलेले रहस्य म्हणजे नागभूमीचे तत्कालीन अर्थमंत्री ए. सी. जमीर यांनी नेपाळी बँकांत दडविलेला काळा पैसा ! का कोणास ठाऊक, पण सी. बी. आय. ने या प्रकरणाची वाच्यता फार होऊ न देता

मुख्यमंत्री विझोल यांच्या कानावर मात्र ही सर्व हकीगत घातली. केन्द्रीय गृहमंत्रालयानंही काही आदेश जारी केले, परिणामतः 'पक्षांतर्गत मतभेदाच्या' नावाखाली विझोल यांनी ए. सी. जमीर यांची उचलबांगडी केली!

पुढे जमीर यांनी पाच-सहा आमदारांचा स्वतःचा एक पुरोगामी गट निर्माण केला व इंदिरा काँग्रेस आणि नागा राष्ट्रीय पार्टी यांच्या सहाय्याने विझोल सरकार पाडण्याच्या कारवाया सुरू केल्या. केन्द्रात इंदिरा गांधींचं सरकार आल्यावर या प्रयत्नांना केन्द्र सरकारचेही आशीर्वाद लाभले. हा धोका ओळखून मुख्यमंत्री विझोल यांनी जातीने दिल्ली-वारी केली आणि इंदिराजींकडून आपल्या सरकारला अभय मागितलं. धूर्त इंदिराजींनी एकीकडे विझोल सरकारला अभय देतानाच जमीर यांच्या कारवायांनाही उत्तेजन दिलं. परिणामतः ५८ सदस्यांच्या विधानसभेत ३१ जणांचा पाठिंबा मिळवून ए. सी. जमीर यांनी सत्ताग्रहण केलं.

## फिझोचे नेतृत्व

बंडखोर नागांच्या हालचाली व त्यांना चीनकडून मिळणारी शस्त्रास्त्रांची मदत याविषयी वारंवार वाचलेल्या बातम्यांमुळे नागांच्या भूमिगत हालचालींविषयी जमेल तेवढी माहिती मिळवायची असं मी नागभूमीत येण्यापूर्वीच ठरविलं होतं. अर्थात या विषयावर सर्वसामान्य नागालोकांशी बोलायचं म्हणजे धास्तीच वाटत असे! कारण, एक म्हणजे ती व्यक्ती भूमिगत कारवायांशी संबंधित असली तर तिची प्रतिक्रिया काय होईल हे सांगणे कठीण; पण याहीपेक्षा महत्त्वाचं कारण म्हणजे सर्वसामान्य नागांच्या चेहऱ्यांवर ठाण मांडून बसणारे ते उग्र भाव! मुळात मंगोलियन चेहेरेपट्टी (बारीक डोळे, बसकं नाक, रुंद हनुवटी इ.) आकर्षक नाही. बहुसंख्य नागांच्या डोळ्यांत एक प्रकारची हिंस्र भावछटा मला नेहमी जाणवली. कदाचित नागांच्या व्यक्तिमत्त्वातला तो एक स्थायीभाव असेल, कदाचित माझ्या नागांविषयांच्या पूर्वसमजुतीमुळे तो एक भास होत असेल; काहीही असले तरी हे जाणवत होते एवढे मात्र खरे. दीमापुराहून कोहिमाला जाताना बसच्या तिकिटासाठी एका लांबलचक रांगेत मी उभा होतो. तेव्हा माझ्या मागच्याच काही कॉलेज विद्यार्थ्यांशी बोलायचा मी प्रयत्न केला; पण जुजबी उत्तरांपलीकडे फारसं काही बोलायला ते नाखूष वाटले. त्यांच्या मला अगम्य असलेल्या नागामी भाषेत मात्र ते ओरडल्यासारखे जोरजोरात गप्पा मारीत होते. ब्रूस लीच्या त्या प्रसिद्ध चित्रात त्याची जशी धारदार नजर आहे तशीच काहीशी, त्याच्याच तोंडवळ्याच्या या नागा विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत मला प्रथम दिसली. नागांना बोलतं करणं एकूणच कठीण असल्याची झालेली ही पहिली जाणीव!

नागभूमीच्या भारतातील विलिनीकरणास विरोध असलेल्या व परकीयांच्या साह्याने नागभूमी स्वतंत्र करण्याच्या इराद्याने गेली अनेक वर्षे व आजही या भागात कुठे उघडपणे कार्यरत असणाऱ्या नागा बंडखोरांचा नेता झेड. ए. फिझो, १९६० पासून 'राष्ट्रकुलाचा नागरिक' म्हणून ब्रिटनमध्ये राजकीय आश्रय घेऊन आहे. बाह्यतः फिझोचा नागांवरील प्रभाव हळूहळू कमी होत असला तरी तो पूर्णतः नष्ट करणे सोपे नाही, आजही बहुसंख्य नागांना फिझो हा आपला सर्वोच्च नेता वाटतो, ही वस्तुस्थिती आहे.

स्वतंत्र नागभूमीच्या कल्पनेनं झपाटलेल्या या ७७ वर्षांच्या वृद्ध नागा-नेत्याच्या तोंडावरून अलीकडेच वारं गेल्यामुळं त्याची प्रकृती खालावत चालली आहे; पण असं असलं तरी भारत व ब्रह्मदेशातील सर्व नागांना एका झेंड्याखाली आणून त्यांचं स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र बनविण्याची कल्पना त्यानं सोडून दिलेली नाही.! 'फिझो अँन्ड नागा प्रॉब्लेम' (लेखक-न्हिसिझोखो झिन्यू) या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकात फिझोची एक मुलाखत उद्धृत करण्यात आली आहे. या मुलाखतीत फिझोनं म्हटलं आहे की, नागालँडला स्वातंत्र्य द्या अशी माझी मागणी नाही! आम्ही मुळातच स्वतंत्र आहोत! भारतानं आपल्या सेनेच्या बळावर आम्हा नागांना पारतंत्र्याच्या जोखडात अडकविलं आहे. तेव्हा या सेना हटवाव्यात एवढीच माझी मागणी आहे. थोडक्यात म्हणजे एकदा भारतीय सेना नागभूमीतून दूर झाली की आपोआपच स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून नागालँडचा उदय होईल! फिझो पुढे म्हणतो, 'भारतानं सेना काढून घेतल्या नाहीत तर छोट्या राष्ट्रांना गिळंकृत करणारं राष्ट्र म्हणून भारताची उभ्या जगात नाचक्की होईल! गांधीवादी मार्गानं सुरू असलेला आमचा लढा मात्र सुरूच राहील!'

याच मुलाखतीत फिझोनं म्हटल्याप्रमाणे नागभूमीत तैनात केलेल्या भारतीय सैनिकांची संख्या दोन लाख एवढी प्रचंड जरी नसली तरी फार मोठ्या संख्येनं भारतीय जवान या भागात आहेत यात शंका नाही. नागा बंडखोरांच्या भूमिगत कारवायांना केव्हा ऊत येईल याचा नेम नसल्याने भारत सरकार या फौजा काढून घेण्याची सुतराम शक्यता नाही. केंद्र सरकारची याबाबतची भूमिका अगदी रोखठोक आहे. '१९६३ पासून नागभूमी भारतातील एक राज्य बनल्यापासून नागभूमीचे स्वातंत्र्य व सार्वभौमतेचा प्रश्न उपस्थित होत नाही अशी केंद्राची भूमिका असून माजी पंतप्रधान मोरारजी देसाईंनी आपल्या लंडनभेटीत सडेतोडपणे ती फिझोच्या कानावर घातली होती. 'सर्व नागा बंडखोरांना कायद्यानुसार शिक्षा होईल व काहींना फासावर देखील लटकविले जाईल!' हेही मोरारजी देसाईंनी फिझोला ठणकावून सांगितले होते.

सर्वसामान्य नागांना त्यांच्या राज्याच्या भारतातील विलिनीकरणाबाबत काय वाटते याचा अंदाज घेणे कठीण असले तरी भारताविषयी फारशी आपुलकी त्यांच्या मनात नाही, एवढं मात्र जाणवतं. कदाचित त्यामुळेच १९७५ मध्ये भूमिगत नागा बंडखोरांचे नेते व भारत सरकार यांच्यात झालेल्या शिलाँग करारानंतरही भूमिगत हालचाली पूर्णपणे थांबलेल्या नाहीत. भूमिगत चळवळीला सहाय्य न करणाऱ्यांना सतावण्याचे प्रकार अद्यापही घडत आहेत. अलीकडेच नागा बंडखोरांनी एका भारतीय गस्त-चौकीवर हल्ला करून सुमारे २० जणांना ठार मारून शस्त्रे व दारूगोळा पळविला! हल्लेखोर जहाल माओवादी नागांचा बंडखोर नेता मुईवाह याचे अनुयायी होते व त्यांनी माओचं चित्र असलेली मुईवाहची हस्तपत्रकेही उधळल्याचं समजलं.

बंडखोर नेता मुईवाह आणि आयझॅक स्वू यांना यांचं नेतृत्व

मानणारा हा जहाल नागांचा गट ब्रह्मदेशातून हालचालींची सूत्रे हलवीत असल्याचंही समजलं. नवलाची बाब म्हणजे या बंडखोरांना आता फिझोचं नेतृत्व मान्य नसून त्यांनी श्री. खाबलांग यांच्या नेतृत्वाखाली 'सुप्रीम कौन्सिल ऑफ नागा इंटरनॅशनल' ही नवी संघटना स्थापन केली आहे. या संघटनेस व तिच्या बंडखोर नागा सदस्यांना अद्यापही चीनकडून शस्त्रे व जीवनावश्यक वस्तू मिळत असाव्यात असा दाट संशय माहितगारांनीही व्यक्त केला आहे.

## ख्रिस्तीकरणाचा वेग

मेघालयाप्रमाणेच नागभूमीतही सरकारदरबारी सर्वत्र ख्रिश्चनांचं साम्राज्य आहे. ६० टक्क्यांपेक्षा अधिक नागा आज ख्रिश्चन झाले आहेत व इथेही मूळ नागासंस्कृती लयाला जात असून पाश्चात्य संस्कृतीचा ईशान्य भारतीय अवतार जन्माला येत आहे. नागभूमीत–विशेषतः कोहिमात–अपेक्षेपेक्षा खूपच अधिक आधुनिकपणा व संपन्नता मला आढळली. जगातल्या सर्व अत्याधुनिक फॅशन्स या दऱ्याखोऱ्यांतही आहेत, चैनीच्या सर्व साधनांची उपलब्धता आहे आणि विलासाचे सर्व मार्ग मोकळे आहेत. आर्थिकदृष्टचा मागसलेल्या नागभूमीत ही संपन्नता आली कुठून ? वाढतं ख्रिस्तीकरण व सरकारी पैशाची अव्याहत उधळण ही यामागची दोन कारणं सांगितली जातात. नागांनी ख्रिस्ती व्हावं यासाठी नाना प्रलोभनं दाखविली जातात व वारेमाप पैसा वाटणं आणि चैनीच्या वस्तू पुरविणं ही त्यातली दोन मुख्य प्रलोभनं आहेत ! जवळजवळ सर्वच शाळा चर्चने चालविलेल्या आहेत व त्यात शिक्षण, जेवण, कपडे इ. सर्व मोफत मिळण्याची सोय आहे. यामुळे वाचलेला पैसा स्वाभाविकच छानछोकीच्या व चैनीच्या वस्तूंसाठी उधळला जातो ! 'नागा बंडखोरांचा निःपात करण्यासाठी आणखी पैसा द्या !' असा लकडा लावून, या नावाखाली नागभूमी सरकारने आतापर्यन्त केन्द्र सरकारला अक्षरशः लुटलं आहे असंही अनेकांकडून सांगण्यात येतं. ही सर्व लूट अनुदाने व शिष्यवृत्त्यांच्या नावाखाली उधळली जाते; म्हणूनच परीक्षेत केवळ उत्तीर्ण होणारा विद्यार्थीसुद्धा नागभूमीत शिष्यवृत्ती–धारक ठरतो !

खासींपेक्षाही नागालोक भारतीय संस्कृतीशी अधिक अपरिचित असल्याने ख्रिस्ती धर्मप्रसाराचं काम नागभूमीत अधिकच सोपं होतं. स्वातंत्र्योत्तर काळात या कामाचा वेग अधिकच वाढला व १९४७ पूर्वी एकूण लोकसंख्येत अवघे २० टक्के असलेले ख्रिश्चन १९७१ अखेर ६६ टक्के एवढे वाढले आहेत. दीमापूर व कोहिमातील तीनचार शाळा वगळता सर्व शाळा व शिक्षणसंस्था आज ख्रिश्चन मिशनरी चालवीत आहेत. या सबंध भागात बॅप्टिस्ट पंथीयांचं प्राबल्य असून सर्वत्र त्यांचीच प्रार्थनामंदिरे आहेत. नागभूमीत ख्रिश्चनांचं एवढं प्रस्थ मोठं आहे ! रविवारी सर्वांना चर्चमध्ये जायला मिळावं यासाठी प्रत्येक रविवारी शहरातले सर्व व्यवहार जवळजवळ बंद असतात. कारखाने, दुकाने, उपहारगृहे ही तर बंद असतातच; पण नागभूमी स्टेट ट्रान्स्पोर्टची बसवाहतूकही रविवारी पूर्णपणे तहकूब असते !

तुएनसंग आणि मीन या मागासभागापर्यंत अद्याप ख्रिस्ती धर्मप्रचारक नीटपणे पोचलेले नाहीत. कोहिमा व मोकोकचुंग जिल्ह्यांत मात्र त्यांनी 'ख्रिश्चन स्टेट' अनधिकृतरीत्या घोषित केल्यासारखेच आहे. ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या या कोहिमा–इंफाळ विभागात (Diocese) एकूण ४८ धर्मप्रसारक, ११५ धर्मभगिनी व ३५५ धर्मबंधू कार्यरत आहेत. या विभागात ख्रिश्चनांनी १०९ प्रार्थनामंदिरे, २२ वसतिगृहे, १ इस्पितळ, १४ दवाखाने, ३९ प्राथमिक व २७ माध्यमिक विद्यालये स्थापन केली असून ख्रिश्चनांच्या कार्याचा हा व्याप उत्तरोत्तर वाढतच आहे.

ख्रिश्चनांचा व्याप जसा वाढता आहे तसा त्यांचा उपद्रवही वाढताच आहे. अगदी अलीकडची घटना म्हणजे गेल्या सप्टेंबरमधली. दीमापूरपासून ६ कि. मि. अंतरावर या भागात रंगापहार नावाचे एक गाव आहे व या गावातलं शिवालय सबंध पूर्वांचलात प्रसिद्ध आहे. नागांमधील संगताम जमातीच्या टोळीनायकाच्या स्वप्नात एकदा शंकर–पार्वती आले होते व या मंदिराच्या परिसरात आपण पुन्हा एकदा अवतार घेऊ असं आश्वासन शंकरानं या टोळीनायकाला दिलं होतं, अशी दंतकथा या मंदिराबद्दल सांगितली जाते. दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी या गावात शंकराची जत्रा भरते व सबंध पूर्वांचलातून मोठ्या संख्येनं यात्रेकरू या ठिकाणी येतात. नागभूमीत हिंदूधर्माचं ढळढळीत आश्रयस्थान बनलेलं हे ठिकाण ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या नजरेतून सुटणं शक्यच नाही ! यापूर्वी अनेक वेळा मंदिराच्या पुजाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार झाले; पण गेल्या २६ सप्टेंबरचा प्रकार मात्र अभूतपूर्वच होता. त्या दिवशी रात्री आठ वाजता ६ ख्रिश्चन नागांनी कमरेला पिस्तुले अडकवून मंदिरावर हल्ला केला व पुजाऱ्याला बेशुद्ध होइस्तोवर मारले ! नंतर आणखी ५० सशस्त्र नागांच्या मदतीने त्यांनी देवळातील विविध देवतांच्या मूर्ती व तसबिरी फोडल्या आणि शेवटी शिवलिंग उखडून टाकण्यासाठी प्रयत्न केले ! कठीण शस्त्रांचे घाव घातल्यानंतरही शिवलिंग भंगत नाही वा उखडून येत नाही हे पाहताच त्यांनी सर्व पूजासाहित्य एकत्र करून ते शिवलिंगावर ठेवलं व त्यावर डिझेल ओतून त्याला आग लावून दिली !

या घटनेच्या रीतसर चौकशीसाठी दीमापुरातील अनेकांनी प्रयत्न केले; पण राज्यसरकारने अद्यापही कशाचीच दखल घेतलेली नाही ! दीमापूरच्या उपविभागीय आयुक्तांना मात्र हिंदूंच्या आग्रहास्तव प्रतिष्ठित नागरिकांची एक बैठक बोलाविणे भाग पडले; पण या बैठकीतही आयुक्तांची भूमिका उरफाटीच होती. ख्रिश्चनांना काही दोष देण्याऐवजी त्यांनी 'अरुणाचलातील धर्मस्वातंत्र्य–विधेयकाची ही प्रतिक्रिया आहे,' असं सांगून हल्ल्याचं काहीसं समर्थनच केलं. शेवटी नेहमीप्रमाणे. नागभूमीत जवळजवळ अस्तित्वहीन असलेल्या रा. स्व. संघालाच आयुक्तांनी याही घटनेस जबाबदार धरून मोठाच विनोद केला !

नागभूमीत सरकार–दरबारी सर्वत्र सक्षम असलेल्या ख्रिश्चन लॉबीचा प्रभाव किती मोठा आहे याचं एकच उदाहरण म्हणजे धर्मस्वातंत्र्य विधेयकाविरुद्ध नागभूमी विधानसभेनं केलेला ठराव ! दीड वर्षापूर्वी धर्मस्वातंत्र्य विधेयक संमत करून अरुणाचल प्रदेशाच्या सरकारने ख्रिस्तीकरणाला आळा घालण्याचा प्रयत्न केला तेव्हा या विधेयकाचा व अरुणाचल सरकारचा निषेध करणारा ठराव नागभूमी विधानसभेनं संमत केला. सर्व राजकीय संकेत झुगारून शेजारच्या राज्यसरकारचा निषेध करणारा ठराव मांडण्यात आल्याचं भारतातील हे पहिलंच उदाहरण असावं !

मेघालयातील सेंग खासी चळवळीप्रमाणे ख्रिस्तीकरणाला विरोध करण्यासाठी या भागात राणी गायडींलू यांची हाराका चळवळ पुढे आली. ही चळवळ व सबंध पूर्वांचलातील हिंदुत्ववाद्यांची शक्ती, त्यांच्या हालचाली व सबंध पूर्वांचलात त्यांच्यापुढे उभ्या असलेल्या आव्हानांचं स्वरूप यांचा आढावा यानंतरच्या म्हणजेच समारोपाच्या लेखांकात.

[ क्रमशः ]

# अनंत काणेकर

## परिकथेतला राजकुमार आणि माणसातला ' माणूस '

भीमराव कुलकर्णी

गुरुवर्य काणेकरांच्या मृत्यूची वार्ता तशी अनपेक्षित नव्हती! पंधरा-वीस दिवसांपूर्वी त्यांना भेटायला म्हणून बाँबे हॉस्पिटल-मध्ये गेलो होतो, तेव्हाची त्यांची विकल अवस्था पाहून सारे काही कळून चुकले होते. एकीकडे पऱ्यांच्या राज्यातील चिरतरुण राज-कुमाराप्रमाणे काणेकरांना आम्ही पाहत आलो होतो, तर दुसरीकडे त्यांच्या अखंड प्रेमाच्या आणि मायेच्या सावलीत बहरणाऱ्या आम्हा मलांना ते आमच्या वडिलांच्या ठिकाणी होते. काणेकरांची ही दोन्ही रूपे अतिशय विलोभनीय होती; परंतु हॉस्पिटलमधल्या खाटेवर अर्धवट सुषुप्तीत अंथरुणाला खिळलेली ती कृश मूर्ती पाहून मनातल्या पहिल्या चित्राला तडा गेला होता आणि मनाने धीर सोडला होता! निरोप घेताना त्यांनी अर्धवट डोळे उघडले आणि स्नेहार्द्र नजरेने पाहत माझा हात हातात घेऊन म्हटले,

' आता ही आपली शेवटची भेट ! '

त्यांच्या तोंडून शब्द नीट बाहेर पडले नव्हते; परंतु त्यांच्या हातांच्या स्पर्शाने त्यांना काय म्हणावयाचे आहे, हे मला बरोबर सांगितले. त्यांच्यातल्या पित्याचा तशाही अवस्थेतला तो मनाला खोलवर स्पर्शून जाणारा साक्षात्कार होता. बाहेर आल्यावर अगदी गलबलून आले !

४ मेला त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून अगदी सुन्न होऊन गेले. आपण पोरके झाल्याच्या भावनेने अनावर अश्रूंनी दुःखाला वाट करून दिली.

काणेकरांच्या मृत्यूचे दुःख इतके खोलवर मनाला भिडणारे का असावे, याचा मी जसजसा विचार करायला लागतो, तसतसे काणेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे असाधारण पैलू लक्षात यावयास लागतात आणि जन्मभर माणुसकी जोपासलेल्या या थोर माणसाचे सान्निध्य आणि सहवास आपणाला लाभला याबद्दल फार मोठी धन्यता वाटते !

सिद्धार्थ कॉलेजमध्ये मी काणेकरांचा विद्यार्थी होतो. बीएच्या दोन वर्षांच्या काळात त्यांचा अधिक निकटचा संबंध आला. याच काळात त्यांनी मला लिहावयाला प्रोत्साहन दिले. मी लिहिलेले काही अर्धकच्चे समीक्षणात्मक लेख त्यांनी वर्गात वाचून दाखविले व भरवर्गात कौतुक केले. ' नवाकाळ 'मध्ये मी त्या काळी मुंबईच्या महाविद्यालयोन सांस्कृतिक घडामोडींवर टीकाटिप्पणी करणारे सांस्कृतिक सदर लिहीत असे. त्यातच अधूनमधून परीक्षांना लाव-लेल्या क्रमिक पुस्तकांवर समीक्षणात्मक लेख लिहीत असे. त्यांमध्ये त्या वेळी इंटरला लावलेल्या काणेकरांच्या ' पिकली पाने ' या पुस्तकावर एक मोठा लेख लिहिला होता. त्याच आठवड्यात कॉलेजात मी जिना उतरत असताना काणेकरांनी मला पाहिले आणि बोलावून तडक इंटरच्या वर्गावर घेऊन गेले आणि ' पिकली पाने ' ' या पुस्तकावर हा आता बोलेल ' असे जाहीर करून टाकले. अक्षरशः मला घाम फुटला. मी धीर धरून पंचेचाळीस मिनिटे बोललो. सुमारे १५० विद्यार्थ्यांच्या वर्गात एवढा वेळ बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग !

तास संपल्यानंतर काणेकरांनी पाठीवर शाबासकीची थाप दिली. त्याची आठवण झाली की, अजूनही मन पुलकित होते, अंगावर रोमांच उभे राहतात ! काणेकरांसारख्या इतक्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या त्या वेळी काहीच नसलेल्या एका अगदी बावळट दिसणाऱ्या मुलावर इतके प्रेम का करावे ? मग आता काणेकरांच्या आठवणीने भडभडून येणार नाही तर दुसरे काय होणार ?

काणेकरांनी शिक्षक म्हणून वाङ्मयाचा एक नितळ असा संस्कार दिला आणि नंतरच्या काळात त्यांच्या अंतःकरणात दडलेल्या एका थोर माणसाचे सारखे दर्शन घडत गेले. त्याला कधीही तडा गेला नाही वा त्यांच्या आपल्या संबंधात कधीही व्यावहारिक कोरडेपणा आला नाही.

काणेकरांचे वर्गात शिकविणे अगदी निराळे असे. लावलेल्या क्रमिक पुस्तकावर आम्ही ज्या प्रकारे वर्गात बोलतो तसे ते बोलत नसत त्या पुस्तकाच्या निमित्ताने ते अनेक गोष्टींना हात घालत. त्या पुस्तकामध्ये माणसाच्या भावना, संवेदना कितपत जाणवतात हे ते पाहत आणि गोष्टीवेल्हाळपणाने अनेक अंगांना स्पर्श करीत ते बोलत राहात. कोणत्याही पुस्तकामध्ये चांगले काय आहे, इकडे त्यांचे प्रामुख्याने लक्ष असे आणि त्या पुस्तकाबद्दलच्या प्रतिकूल मतांचा परामर्श घेतानाही, त्याची चांगली बाजू मांडून त्याचे ते समर्थनच करीत. पुस्तकांना समोर ठेवून शिकविण्यापेक्षा त्यांच्या निमित्ताने ते अधिक बोलत. त्यातून दिसून येई तो कलाकृती व साहित्यिक यांच्याबद्दलचा त्यांचा अपार जिव्हाळा ! काणेकरांचे शिकविणे त्यामुळे कधीही पुस्तकी वा प्राध्यापकी होत नसे. विशेषतः काव्य-शास्त्र, साहित्यसमीक्षा यासंबंधी बोलताना त्यांच्या स्वतंत्र दृष्टि-कोनाचा नेहमीच प्रत्यय येत असे.

काणेकर वर्गात आम्हाला फार थोडे कळले. ते खरे कळले ते वर्गाबाहेर. त्यांच्या व्याख्यानांतून, त्यांच्या गप्पागोष्टींतून आणि विशेषतः त्यांच्या लेखनातून. त्यांचे लेखन आणि त्यांचे चालणे-बोलणे यात काहीच फरक नसे. त्यांचे सारे लेखन म्हणजे त्यांच्या उमद्या, संपन्न आणि खेळकर परंतु विचारगंभीर जीवनाचेच एक पारदर्शक चित्र. अगदी सहजसाध्य एखाद्या प्रसंगातून ते नकळतच तुमच्या खोलवरच्या भावनांना स्पर्श करीत. त्यात कसली भावविव-शता नसे वा शब्दांची आतषबाजी नसे.

मी मुंबईहून पुण्याला आलो. लोकमान्यनगरमध्ये जागा मिळाली. उन्हाळ्याचे दिवस होते. एकदा संध्याकाळी माझ्याकडे आले. समोर पर्वती दिसत होती. चल पर्वतीला जाऊ म्हणाले. काणेकरांना

बोलण्याची तशी चालण्याचीही मोठी हौस ! ते चालता चालता बोलत आणि बोलता बोलता वेगाने चालत. त्यांच्याबरोबर बोलता बोलता चालताना व चालता चालता बोलताना माझी नेहमी त्रेधातिरपिट उडे ! पर्वतीवर गेल्यानंतर मागच्या बाजूने ते बराच वेळ डोंगर-कड्यांकडे पाहत उभे राहिले. त्यांच्या समाधीचा भंग करीत मी म्हणालो,

'पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले; परंतु इथे पर्वतीवर नानासाहेब पेशव्यांची समाधी पाहा कशी पत्र्याच्या शेडमध्ये आहे ती ! बघून वाईट वाटते. एखादी टोलेजंग आकर्षक इमारत उभी करायला काय हरकत होती ?

'बरं झाले, इथे त्यांनी तू म्हणतोस तशी टोलेजंग इमारत उभी नाही केली ती ! हे असे इतके सुंदर दिसणारे हे निळे आकाश झाकोळून गेले असते. पेशव्यांचे पाय मातीचे होते आणि त्यांना ज्या परिस्थितीत दिवस काढावे लागले, त्याचे ही साधी समाधी हेच खरे प्रतीक आहे. त्यांनी मोठी इमारत बांधली असती तर या पुण्यात ती खोटी दिसली असती !'

काणेकरांचे वेगळेपण, त्यांची विचार करण्याची पद्धती अशा प्रसंगातूनच एकदम लक्षात येत असे.

माझे लग्न झाल्यानंतरच्या पाच-सहा महिन्यांतली आणखी एक गोष्ट !

मी घरी नव्हतो. बाहेरगावी गेलो होतो. घरी माझी पत्नी एकटीच होती. सकाळी ९ च्या सुमारास काणेकर अचानक घरी आले. 'मला आंघोळ करायची आहे. थोडे पाणी तापव! ' म्हणाले. माझ्या पत्नीला काणेकरांची ओळख नव्हती. हे कोण असावेत याचा विचार करीत संभ्रमावस्थेत तिने काही न बोलता त्यांची सरबराई केली. 'मला अगदी थोडेच जेवायचे असते' असे सांगून त्यांनी ज्वारीची भाकरी करावयास सांगितली आणि चवीने थोडेच परंतु चांगले जेवले. थोडा वेळ वामकुक्षी घेऊन ते निघून गेले. जाताना ते म्हणाले,

'भीमरावला म्हणावे, मी येऊन गेलो. त्याला जपा. त्याने खूप भोगले आहे !'

दुसऱ्या दिवशी बायकोने सारी हकीकत सांगितल्यावर मी लगेच ओळखले की, काणेकर येऊन गेले म्हणून 'त्याने खूप भोगले आहे' असे माझ्याबद्दल सांगणारे दुसरे कोण असणार ?

आणखी एकदा माझ्याकडे काणेकरांची गप्पांची बैठक अशीच रंगली होती. बोलण्याच्या भरात काणेकर पां. वा. गाडगीळ आणि प्रभाकर पाध्ये पुणे–मुंबई प्रवासातील झालेल्या वादविवादाचे साभिनय वर्णन करीत होते. दोघेही अटीतटीला येऊन आपला मुद्दा कसा सोडत नव्हते आणि दादर स्टेशन आल्यानंतर उतरताना पाध्ये गाडगिळांना–' मी माझा मुद्दा आणखी विस्ताराने पटवून देण्यास तयार आहे ' हे वाक्य कशा सुरात म्हणत होते हे सांगता सांगताच काणेकर एकदम म्हणाले,

'चल रे, पाध्यांकडे जाऊन येऊ !' आणि स्कूटरवर मागे बसवून मी त्यांना पाध्यांकडे घेऊन गेलो. (अगदी सत्तरी उलटल्यावर देखील स्कूटरवर मागे बसण्यात काणेकरांना काही वाटत नसे. ते मजेत मागे बसून सारखे बोलत राहत.) पाध्यांकडे तासभर गप्पा-गोष्टी झाल्यानंतर ते रस्त्यात म्हणाले, 'या वाङ्मयाबद्दल आणि राजकारणाबद्दल पाध्यांच्या इतका उदंड उत्साही माणूस तुला दिसणार नाही ! त्यांचा एकुलता एक मुलगा गेला, त्याचे दुःख मी अजून विसरू शकलो नाही. पाध्ये त्या दुःखाच्या अथांग सागराच्या पृष्ठभागावर उभे आहेत; साहित्याच्या निष्ठेनेच त्यांना या दुःखातून तारले आहे. त्यांच्याबद्दल अनादराचा शब्दही त्यामुळे आमच्या तोंडून बाहेर पडू शकणार नाही !'

काणेकरांच्या या उद्‌गाराने माझी पाध्यांच्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. साहित्यपरिषदेत एकदा माझे त्यांचे भांडण झाले होते, त्याची खंत वाटली. काणेकरांनी आपल्या वागण्याने अनेकदा जीवनविषयक दृष्टीच बदलायला लावली आहे. काणेकर गप्पा-गोष्टीत खूप रमत, रंगत. त्यांच्याशी गप्पा मारण्याची गोडी अवीट असे. त्यामध्ये ते अनेकांच्या आठवणी सांगत. विसंगतींची चित्रे रेखाटून खूप हसवीत; पण त्यांनी कधी कुणाची निंदा केली नाही ! आचार्य अत्र्यांनी अनेकांना नावे ठेविली; परंतु काणेकरांना अगदी जवळचे मित्र मानले, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

काणेकरांचे 'अनन्तिका' हे आत्मचरित्र गेल्या वर्षी प्रसिद्ध झाले. अर्थात ते आत्मचरित्र नाहीच. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे आत्मचरित्रात्मक स्मृतिलहरी आहेत. त्यांनी प्रसंगोपात्त लिहिलेले काही आठवणीवजा लेख डॉ. मालशे यांनी त्यांच्याकडून मागून घेतले आणि त्यांचे संपादन केले. (या कामी मीही त्यांना उगीच नावापुरता थोडा हातभार लावला.) वास्तविक काणेकरांचा जीवनानुभव इतका मोठा होता की, त्यांनी या आपल्या अनुभवांची मांडणी आत्मचरित्र लिहून केली असती, तर ते मोठेच कार्य झाले असते ! काणेकर त्या गोष्टीस तयार नव्हते. निदान त्यांच्या स्मृतिलहरीत त्यांनी आपल्या आयुष्यातील काही महत्त्वाच्या घटनांबद्दल लिहावे, असे आम्ही त्यांना सुचवून पाहिले. एकदा काणेकरांनी याबाबतचे माझे सारे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तितक्याच शांतपणे ते म्हणाले,

'मी Personal आणि Private व्यक्तिगत आणि खाजगी, यातला भेद महत्त्वाचा मानतो. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील घटना कळाव्या म्हणून त्याचे आत्मचरित्र आपण वाचतो हे खरे आहे; परंतु एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिगत जिणे कळणे वेगळे आणि त्याचे खाजगी आयुष्य कळणे वेगळे. माणसाचे सारेच काही खाजगी वागणे बोलणे आपणाला कधी कळत नाही आणि ते कळण्याची इच्छा वाचकाने बाळगू नये. ते मांडण्यामध्ये पराक्रम आहे असे काही जण मानतात, मी तसं काही मानीत नाही. मला ती विकृती वाटते. माझ्या पहिल्या विवाहासंबंधी कारण नसताना ग. य. चिटणिसांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे. त्याला मी सभ्यपणा म्हणत नाही. दुसऱ्याबद्दल राहो; पण स्वतःबद्दल सारेच सांगितले पाहिजे असे मला वाटत नाही. काहीही सांगताना स्वतःच्या आणि वाचकांच्या अभिरुचीचा वाचकाने विचार केला पाहिजे, असे मला वाटते !

काणेकरांचा हा दृष्टिकोण अतिशय महत्त्वाचा आहे. स्वतःसंबंधी अगदी खाजगी गोष्टी सांगू नयेत हे जसे महत्त्वाचे, तसेच आपली मुलेबाळे, आपले नातेवाईक आणि आपले चाकोरीतली नोकरी यासंबंधीच्या किंवा आपल्याशी संबंध नसलेल्या आपल्या काळा-

संबंधीच्या आठवणी यांना आत्मचरित्रात स्थान नसावे, असे त्यांना वाटले आणि ते त्यांचे वाटणे मला त्यांच्या जीवननिष्ठेच्या दृष्टीने सुसंगत व महत्त्वाचे वाटते. काणेकरांच्या 'अनन्तिके'तून त्यांच्या कौटुंबिकतेचे आणि सिद्धार्थ कॉलेजमधल्या घटनांचे चित्र असावे असा आग्रह त्यांच्या या भूमिकेमुळे सोडून द्यावा लागला; परंतु त्यांचे चिपळूणचे एक बापट नावाचे स्नेही होते. त्यांना ते 'एकाक्ष बापट' म्हणत. कारण त्यांना एक डोळा नव्हता. त्यांच्या आठवणी सांगून काणेकर खूप हसवीत, अनन्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीत ह्या आठवणी डिक्टेट करण्याचे काणेकरांनी कबूल केले होते !

'माझे सारे वाङ्मय म्हणजे मीच नाही का? मग वेगळ्या आत्मचरित्राची जरुरी ती काय?' असा प्रश्न काणेकरांनी एकदा विचारला होता आणि ते अगदी खरे आहे, या जाणिवेने मी गप्प बसलो होतो.

काणेकर हे जात्याच कविप्रकृतीचे. त्यांनी सुरुवातीला लिहिलेल्या कविता एकोणिसशेतिशी - पस्तिशीच्या सुमारास ( या शतकाच्या तिशीत ते पंचविशीत आणि पस्तिशीत काणेकर तिशीत होते ! ) रविकिरणमंडळाचा बहर असताना त्यांनी लिहिलेल्या कवितांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. या त्यांच्या कवितांतून तत्कालीन काणेकर नावाच्या तरुणाच्या अस्सल प्रेमानुभूतीचा वास्तव स्पर्श आहे. आपल्या कवितेतील प्रेम हे सेन्ससुएल प्रेम आहे असे ते म्हणत. स्त्री आणि पुरुष यांचे भिडलेले संबंध, लांबून–लांबून, आडून–आडून आलेले संबंध वा प्रेम नव्हे तर खरेखुरे अस्सल शारीरिक प्रेम– 'वक्षावर माझ्या मान तिची निश्चित' असे एकमेकांना भिडलेले प्रेम, हा त्यांच्या कवितांचा विशेष, साऱ्या मराठी कवितेत अजूनही वेगळा वाटतो. असेच जीवनाशी भिडणारे परंतु भेदकतेमुळे जीवनाचा जिवंत तुकडाच पुढे ठेवणारे त्यांचे लघुनिबंध आणि जीवनाबरोबर जगाला सामोरे जाऊन त्याचे उत्फुल्ल दर्शन घडविणारी त्यांची प्रवासवर्णने हे त्यांच्या लेखनाचे खरे सामर्थ्य !

त्यांच्या लघुनिबंधांमध्ये जीवनाचे वेगवेगळ्या अंगाने दर्शन घडविणारे काणेकर सारखे जाणवतात. स्वच्छ, नितळ अशी त्यांची पारदर्शक शैली विषयाला शब्दाचाही पाल्हाळ न लावता नेमका स्पर्श करते आणि जिवंत अनुभवाचा एक सूक्ष्मदर्शी रंगीत कवडसा उजळवून टाकते. जीवनाच्या अंगांना दुसऱ्या अंगाने स्पर्श करण्यासाठी त्यांनी गणुकाका नावाचा मानसपुत्र निर्माण करून मोठ्या कलात्मक रीतीने आपला सारा आत्मा त्यात ओतला आहे.

संस्कृतीच्या शिष्टाचाराच्या गोष्टी बोलणारे, आपल्या स्वार्थाला थोडा धक्का लागला की त्यांचे सर्व शिष्टाचार व संस्कृती ढासळून पडते; परंतु गणुकाकासारख्या सामान्य माणसांना हे शब्द माहीत नसताना सुद्धा त्यांच्याच कृतीतून खऱ्या संस्कृतीचे कसे दर्शन घडते हे काणेकर सांगतात. एक छोटेसे उदाहरण पुरेसे आहे.

गणुकाकांकडे लेखक गप्पा मारीत बसला असता एक ओळखीचे गृहस्थ येऊन हातवारे करीत गप्पा मारू लागतात. त्यांच्या हाताच्या स्पर्शाने टेबलावरील सुंदर काचेची फुलदाणी पडून फुटते ते बिचारे नर्व्हस होतात. लेखकही रागवतो; पण गणूकाका म्हणतात,

'अहो, यात वाईट वाटून घेण्यासारखे काही नाही. त्या शेजारच्या बंडूनं कालच त्याचे दोन तुकडे करून ठेविले होते. टाकून देण्याऐवजी मी ते आपले जुळवून ठेविले होते. तुम्ही उगाच निमित्त झालात एवढेच. ते तुकडे मी टाकायला पाहिजे होते !'

त्या गृहस्थाच्या मनावरचं ओझं एकदम उतरलेले दिसले. ते निघून गेल्यावर काणेकरांनी गणूकाकांना म्हटले,

'ते फुटके तुकडे उगाच कशाला जुळवून ठेविले होतेत काका?'

'अरे, कुठे फुटले होते ते. चांगली धड होती की फुलदाणी !' काका म्हणाले.

'म्हणजे?' काणेकरांनी विचारले.

'अरे, एकदा फुटली की ती पुन्हा का सांधणार होती? त्या बिचाऱ्याला आणखी वाईट वाटायला कशाला लावायचं?'

गणूकाकांच्या रूपानं काणेकरांनी अशा रीतीने आपल्या असंख्य लघुनिबंधांतून सामान्य माणसांनीच माणुसकीच्या रूपाने आपली संस्कृती कशी जोपासली आहे, हे दाखविले आहे.

गणूकाका हे काणेकरांचेच दुसरे एक अंग आहे.

काणेकर माणसांच्या भावनांची कदर करीत होते म्हणून ते सगळ्यांनाच होय म्हणणारे, वागण्या बोलण्यात पायघोळ होते असे मुळीच नव्हे. उलट ते अतिशय सावध, परखड आणि रोखठोक होते. औरंगाबादच्या साहित्य-सम्मेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून त्यांच्या विलक्षण निःस्पृहतेची कल्पना आली. संयुक्त–महाराष्ट्राचा उल्लेख भाषणांतून त्यांनी टाळावा म्हणून दिवसभर रदबदल्या चालू होत्या. काणेकरांनी सगळ्यांचे ऐकून घेतले आणि जोरदारपणे संयुक्त महाराष्ट्राचा आवाज उठवून विरोधकांना कमालीचे अस्वस्थ केले !

तसे ते चांगले संतापी होते. त्यांच्या अगदी जवळ वावरणाऱ्यांना त्यांचे ते उग्र स्वरूप दिसे. मिसेस काणेकरांनी म्हणूनच त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिसमारंभात 'हे तुमचे काणेकर !' या शब्दात त्यांचे वर्णन करून आपल्या वाट्याला येणाऱ्या काणेकरांचे वेगळेपण सूचित केले होते.

काणेकरांना व्याख्यानांचे आणि प्रवासाचे जणु काही व्यसनच होते. त्या निमित्ताने विविध प्रकृतींच्या माणसांच्या प्रवाहात झोकून देण्याचा मनसोक्त आनंद लुटता येतो, हे त्याच्या पाठीमागचे खरे कारण असावे. अध्यक्ष म्हणून समयोचित असा समारोप करण्याची त्यांची हातोटी विलक्षणच होती. त्यामुळे गेल्या वीस–पंचवीस वर्षांत मुंबईतल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे ते अनभिषिक्त अध्यक्षच झाले होते ! व्याख्यानाप्रमाणे ओळखीच्या लोकांच्या पुस्तकांना भिडेखातर

त्यांनी शेकडो प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या प्रस्तावनांचा एक संग्रह प्रसिद्ध करावा व त्याला 'भिडे भिडे' असे नाव द्यावे, असे डॉक्टर स. गं. मालशे गमतीने म्हणत !

व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सर्व स्तरांशी काणेकरांचा नित्य संबंध येई. राजकीय कार्यकर्ते, सत्ताधारी, मुंबईस येणाऱ्या जगातील सांस्कृतिक क्षेत्रातील मोठमोठ्या व्यक्ती, उद्योगपती, साहित्यिक आणि ... असे एकही क्षेत्र नव्हते की, काणेकरांच्या त्या क्षेत्रातील व्यक्तींशी संबंध नव्हता. मला सहज आठवले,

आणीबाणीपूर्वीच्या कालखंडात मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात माझे व्याख्यान होते. काणेकर अध्यक्ष होते. मध्येच काणेकरांना दिल्लीहून महत्त्वाचा फोन आला म्हणून धावपळ झाली. काणेकरांनी शांतपणे उठून फोन घेतला आणि लगेच ते परत आले. जणू काही झालेच नाही, असाच त्यांचा चेहरा होता !

नंतर कळले की, राजकीयदृष्ट्या काही महत्त्वाचे पद काणेकरांना देऊ करण्यात आले होते. 'मी राजकारणी नाही. मला त्यात रस नाही. क्षमस्व!' असे म्हणून काणेकरांनी तात्काळ फोन खाली ठेविला होता.

काणेकरांना राजकारणाची बित्तंबातमी होती, देशोदेशींच्या राजकारणाचा ते बारकाईने अभ्यास करीत, परंतु ते आपले क्षेत्र नव्हे, याची त्यांनी खूणगाठ बांधली होती. आपल्या सुखदुःखाशी निगडित आणि नित्य परिचयाच्या माणसांतच घट्ट पाय रोवून उभे राहण्यातच त्यांना आनंद होता ! आपल्या प्रवासवर्णनात एके ठिकाणी, बोट भूमध्य समुद्रावरून चालली असता, वरच्या डेकवरून आकाशाकडे पाहात असता, आकाशाच्या अफाट विस्ताराची, त्या काळोखाची आणि त्या अगदी जवळ आलेल्या असंख्य तेजःपुंज तारकांची एकाकीपणाची आपल्याला धास्ती वाटली, त्या भीतीने काळजाचा थरकाप उडून, घाईघाईने डेकवरून खाली आल्याचे त्यांनी वर्णन केले आहे.

असे का व्हावे असे त्यांना विचारले असता ते म्हणाले,

'आकाशाचा भव्यपणा मला कितीही आवडत असला तरी मी जमिनीवर उभा आहे, ही जाणीव मला तितकीच आवडते. जे नित्याच्या परिचयातले आहेत, सुखदुःखाशी संबंधित आहेत त्यांच्या जवळ असणं मला आवडतं.' काणेकरांच्या चिरतारुण्याचे आणि अजातशत्रुत्वाचे रहस्य या त्यांच्या वृत्तीत आहे.

या काणेकरांच्या वाङ्मयातच खरे काणेकर आहेत. 'माणूस' हा त्यांचा खरा परवलीचा शब्द आहे. माणसांखेरीज काणेकरांना काही प्रिय नाही ! त्यांच्या कित्येक लघुनिबंधांची नावे, त्यांचा आशय सारा या माणुसकीशी निगडित आहेत. त्यांच्या एकुलत्या एका चित्रपटकथेचे नाव आहे 'माणूस !' या माणसांच्या विश्वातून ते निसर्गाच्या विश्वात जाताना हा निसर्ग त्यांना सुंदर, काव्यमय वाटतो. त्यांच्या साऱ्या पुस्तकांची नावेच त्याची निदर्शक आहेत– चांदरात, निळे डोंगर, तांबडी माती, धुक्यातून लाल ताऱ्याकडे, खडक कोरतात आकाश, चौकोनी आकाश, पांढरी शिडे, रक्ताची फुले......

म्हणूनच काणेकर गेल्याचे विलक्षण दुःख होत असले तरी त्यांच्या आठवणींच्या आणि वाङ्मयाच्या रूपाने तेच ते परिचित, चिरतरुण असे काणेकर अंतःकरणात कायमचे वास करून आहेत, राहतील यात शंका नाही ! □

# कृतार्थ (वाङ्मय) जीवनाची सांगता

चंद्रशेखर राजे

के. श्री. म. माटे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी मराठीच्या प्राध्यापकांची– आपल्या शिष्यांची–एक अखंड मालिका निर्माण केली. प्रा. अनंत काणेकरांच्या कर्तृत्वाचा आलेख वाचताना त्यांनी निर्माण केलेल्या शिष्यपरंपरेचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. स्मरणशक्तीला अजिबात ताण न देता आठवतात ती नावे म्हणजे डॉ. स. गं. मालशे, प्रा. रमेश तेंडूलकर, प्रा. केशव मेश्राम, डॉ. वसंत सावंत, श्री. माधव अत्रे, सौ. उषा प्रधान. ह्यांपैकी काही-जण महाविद्यालयात शिकवीत नसले तरी लेखनाची प्रेरणा यांनी साक्षात काणेकरसरांकडून घेतली. साक्षात म्हणावयाचे कारण असे की, असे अनेकानेक शिष्य अप्रत्यक्षरीत्या, वर्गात हजर न राहता–निर्माण झाले. त्यांचा शिष्यवर्ग महाराष्ट्रातीलच विविध विद्यापीठांतून पसरला आहे असे नाही, तर महाराष्ट्राच्या बाहेरही त्यांचे अनेक शिष्य विविध विद्यापीठातून मराठीचे शिक्षण देत आहेत. मध्यंतरी त्यांच्या अशा विद्यार्थ्यांचे, मराठीच्या प्राध्यापकांचे संमेलन भरवावे (संमेलन भरविण्याइतकी ती संख्या मोठी आहे) अशी योजना आकाराला येत होती; पण सरांच्या प्रकृति–अस्वास्थ्यामुळे ते संमेलन प्रत्यक्षात येऊ शकले नाही. यापुढे ते भरेलही; पण गुरूंच्या अनुपस्थितीची तीव्र जाणीव सर्वांना प्रकर्षाने जाणवेल यात शंकाच नाही.

त्यांचे विद्यार्थी परीक्षेतल्या यशाची बातमी सांगण्यासाठी कॉलेजात त्यांना भेटावयास जात. स्टाफरूममधील आपल्या सहकाऱ्यांना आणि आलेल्या विद्यार्थ्यांना उद्देशून ते जे एक वाक्य सांगत ते विसरता येणे कदापी शक्य नाही ! त्या वाक्यात त्यांच्या वृत्तीचे, मिष्किलपणाचे सार भरले आहे. ते म्हणत 'आम्ही शिक्षक मोठे का ? तर पास

झालेले विद्यार्थी पेढे घेऊन येतात म्हणून ! उद्या जर नापास झालेले विद्यार्थी जोडे घेऊन आले तर काय होईल ?' कोणत्याही शिक्षकाने कधीही न विसरण्याजोगे हे वाक्य आहे यात शंकाच नाही.

त्यांचा बी. ए. चा वर्ग असो वा एम्. ए. चा वर्ग असो तो परीक्षार्थींसाठी नसायचाच. वाङमयाची आवड निर्माण करणारा, आवड असणाऱ्यांना डोळस करणारा आणि लेखनाच्या क्षेत्रात लुडबूड करणाऱ्यांना मार्गदर्शन करणारा असा प्रत्येक तास असे. परीक्षेत काय येईल, परीक्षा कशी उत्तीर्ण करता येईल, चांगले गुण कसे मिळतील याची फिकीर करणाऱ्या परीक्षार्थींसाठी ते तास नसत. सरांची (अजूनही त्यांच्यामागे कै. लावण्याची तयारी होत नाही.) वक्तृत्वशैली अजोड होती. संस्कृत, इंग्रजी आणि मराठी ह्या भाषांवरचे असाधारण प्रभुत्व, त्या भाषांतील नव्या–जुन्या साहित्याचे सूक्ष्म वाचन, नव्या–जुन्या प्रवाहांची अचूक जाण असल्यामुळे आणि त्या साऱ्यांनी परिपूर्ण अशी ती व्याख्याने म्हणजे एक मेजवानीच असे. त्यांच्या तीव्र स्मरणशक्तीची, रसपूर्ण अशा वाणीची आणि त्याला जोड मिळायची त्यांच्या विनोदाची. अशी विविधतेने नटलेली ती व्याख्याने प्रेरक आणि प्रोत्साहक न ठरतील तरच नवल ! काव्यशास्त्र शिकविताना त्यांच्यातील संस्कृत पंडित (सर खरे संस्कृतचेच विद्यार्थी) जसा जाणवे तसा पाश्चात्य वाङ्मयाचा गाढा व्यासंगी आपल्यासमोर उभा आहे हेही लक्षात येई. प्रवासात आलेल्या अनुभवांचे कथन ते करीत, त्याचप्रमाणे वाचलेल्या नव्या नव्या पुस्तकांचा उल्लेख (त्यातील सौंदर्यस्थळांसह) सहजपणे येई हे सारे घडत असे सहजगत्या. विद्यार्थ्यांवर इंप्रेशन मारण्यासाठी किंवा स्वतःच्या वाचनाची, व्यासंगाची प्रौढी मिरविण्यासाठी हे उल्लेख येत नसत. कारण तसे करण्याची त्यांना गरजच नव्हती. त्यांचे शिक्षक म्हणून, लेखक म्हणून व्यक्तिमत्त्व केव्हाच साकार झाले होते. त्याचा सुगंध सर्वत्रच दरवळत होता.

सिद्धार्थ कॉलेजमध्ये प्रवेश का घ्यायचा तर तेथे प्रा. अनंत काणेकर आहेत म्हणून ! बी. ए. ला मराठी विषय का घ्यायचा तर काणेकर सर शिकवितात म्हणून ! मराठी घेतल्यानंतर बाहेरच्या जगात आपले काय होईल, व्यावहारिकदृष्ट्या मराठी विषयाचा फायदा काय ? असले भडभुंजे, पोटभरू विचार आमच्या मनात कधीच आले नाहीत! आम्ही काणेकरांच्या प्रेमामुळे तो विषय घेतला. काणेकरसर हे साऱ्या कॉलेजचेच भूषण होते! बाहेरून आलेल्या पाहुण्यासमोर आमचे प्राचार्य सांगत 'हे कॉलेज काणेकरांच्या नावाने ओळखले जाते !' काणेकरांवर प्रेम न करणारा करंटा महाराष्ट्रात मिळणार नाही; मग सिद्धार्थ कॉलेजचे काय ? कोणी तरी एकदा सरांना 'अजातशत्रू' म्हटले. ते तत्काळ म्हणाले 'याचा अर्थ मी वाइटातला वाईट म्हटले नाही असा होणार असेल तर ते विशेषण मला लावू नका !' सरांचे वाद झाले नाहीत, राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन क्षेत्रातील वादांपासून ते अलिप्त होते किंवा केळकरी खाक्या (तुझे बरोबर आहे आणि त्याचेही चूक नाही) त्यांनी स्वीकारला असे नाही. त्यांच्या विरोधाला, मतभेदांना विखार नव्हता. मत्सराचा, कटुतेचा स्पर्श त्याला नव्हता. मित्रांनी प्रेम करावे (केलेही उदंड) आणि मतभेद झालेल्यांनीही प्रेम करावे असा हा उमदा मानव होता. त्यापेक्षाही मी तर असे म्हणेन की त्या विरोधकानेही अभिमानाने सांगावे की 'अनंत काणेकरांशी माझे मतभेद झाले.' असे आमचे सर अंतर्बाह्य उमदे होते !

आम्ही त्यांचे विद्यार्थी चिरतरुणांची यादी करीत असू. त्या चिरतरुणांच्या यादीत सिनेक्षेत्रातील अशोककुमार आणि साहित्यक्षेत्रातील अनंत काणेकर यांच्याशिवाय तिसरे नाव येतच नसे ! पन्नासावा आणि साठावा वाढदिवस थाटामाटाने साजरा झाला असा साहित्यिक विरळाच ! सहज आठवले म्हणून सांगतो. त्यांच्या वाढदिवसाला (बहुधा साठाव्या) ज्या अनेकांनी हार घातले त्या हारात एक हार होता एका जादूगाराचा. विद्यार्थ्यांनी त्यांचे हे दोन्ही वाढदिवस मोठ्या थाटाने आणि आनंदाने साजरे केले. त्यांच्या नावे सिद्धार्थ कॉलेजात ठेविलेल्या (मराठी विषयात प्रथम येणाऱ्यास) बक्षिसांचे, त्यांचा फोटो असलेल्या प्रमाणपत्राचे मोल आम्हा विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाइतके वाटते. तो आमच्या मानाचा, गौरवाचा आणि अभिमानाचा विषय वाटतो.

प्रा. अनंत काणेकर जीवनवादी होते आणि सौंदर्यवादीही होते. किंबहुना असा भेद ते करीतच नसत. जीवनावर प्रेम होते म्हणून कलेवर प्रेम होते. कलेवर प्रेम करीत होते म्हणून जीवनावर प्रेम करीत होते. राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन क्षेत्रातील साऱ्या पुरोगामी चळवळीशी त्यांचा साक्षात संबंध होता. ऐन तारुण्यात ते मार्क्सवादी होते; पण नंतर 'God that failed' अशी अवस्था इतरांची (जगभरच्या अनेक विचारवंतांची आणि लेखकांची) झाली तशीच अवस्था त्यांचीही झाली. ते नेहमी सांगत 'ऐन तारुण्यात (विशीत) तुम्ही मार्क्सवादी नसलात तर तुमच्यात काही तरी उणीव आहे असे समजा आणि चाळिशीनंतर तुम्ही मार्क्सवादी राहिलात तरीही तुमच्यात काही तरी उणीव आहे, तुमचे काही तरी चुकते आहे असे समजा !' असे बजावणारा हा हाडाचा शिक्षक होता. कोठे थांबावे हे त्यांना अचूक कळत होते, म्हणूनच त्यांनी वाङ्मयाच्या विविध दालनांत सहजतेने प्रवास केला. एक दालन, एक वाङ्मयप्रकार भूषविल्यानंतर तितक्याच सहजतेने ते दुसऱ्या वाङ्मयप्रकाराकडे वळत. त्यांनी स्पर्श केलेला प्रत्येक वाङ्मयप्रकार वेगळ्या उंचीवर नेला. त्या क्षेत्रात त्यांचे नाव अढळ, अजर आणि अमर झाले! काळाने प्रा. अनंत काणेकर ह्या व्यक्तीला आपल्यातून नेले असले तरी मराठी भाषा आणि मराठी माणूस जिवंत असेपर्यंत प्रा. अनंत काणेकर हे नाव चिरतरुणच राहणार आहे !

□

हे पाप कोणाचे ? काँग्रेसचे की नोकरशाहीचे ?

# चंद्रपूर जिल्ह्यातील व्याहाड कँप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका निर्वासित छावणीची शोकांतिका

## बाबूराव वरघंटे

चंद्रपूर जिल्ह्यात निर्वासितांची पहिली छावणी वसविण्यात आली ती १९४८ मध्ये. चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय अधिकारी-वर्गाला ऐसपैस चरावयाला मिळालेले हे पहिले कुरण! तीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर देखील या छावणीतील रहिवासी ज्या निर्वासित अवस्थेत पाकिस्तानातून भारतात आले त्याच अवस्थेत आजदेखील आहेत हे सांगूनसुद्धा कुणाला खरं वाटायचं नाही; परंतु ते एक निलाजरं-नागडं सत्य आहे! राजकारणी धुरंधरांचा खेळ झाला आणि या राजकारणी धुरीणांच्या राजकारणी डावपेचात पश्चिम पाकिस्तानातील हिंदू म्हणवणारे बिचारे अकारण भरडले गेले. निर्वासित बेसहारा झाले! भारत सरकारने त्यांना आश्रय दिला खरा; परंतु आजही त्यांना मतदान करण्याच्या राजकीय डावपेचांपलीकडे कुठलेही स्वातंत्र्य नाही-कुठलेही नागरिकत्वाचे अधिकार नाहीत. त्यांना माणूस म्हणून जगायला लागणाऱ्या किमान आवश्यक गरजांची पूर्ती करण्यात आलेली नाही!

**थोडा पूर्वेतिहास:** १५ ऑगस्ट १९४७-भारताचा पहिला स्वातंत्र्य-दिन-भारतीय स्वातंत्र्याची मंगलमय प्रभात; परंतु या निर्वासित बांधवांना ती काळरात्र ठरली! १५ ऑगस्टचा दिवस पाकिस्तानात देखील तसा खुषीचा दिवस पाळण्यात आला. इथले सारे निर्वासित पश्चिम पाकिस्तानातील मुलतान जिल्ह्यातील. त्या दिवसात मुलतान जिल्ह्यातील हिंदू नागरिकांना ज्या दिव्यातून जावं लागलं ते सारं शब्दातीत आहे! आपण इथे भारतात भारतीय स्वातंत्र्याची दिवाळी साजरी करीत होतो, तिथे मुलतान जिल्ह्यात आपल्याच बांधवांच्या रक्ताचा सडा शिंपडला जात होता! इथं फटाकडे उडविले जात होते, तिथं डोकी उडविली जात होती. इथं आनंदाला उधाण होतं, तिथं चीत्कार आणि किंकाळ्या यांनी आकाशाला तडा जात होता. तिथं सैतान पाठीस लागला होता प्रत्येकाच्या नरडीचा घोट घ्यायला!

मुलतान जिल्ह्यातील लोध्रा तालुक्यातील कोटली निजाबाद गावातील चंद्रभान पारीराम राजपूत हा म्हातारा सांगत होता, "साहब, १५ अगस्त की वह रात मैं कभी भूल नहीं सकता। सैतान कब किधर से आएगा और किसको मौत के उतारेगा इसका कोई भरोसा न था। हम सब के सब रात भर कपास के खेतमें छुप कर थे। जोरसे साँस खींचने को भी डर लगता था। खेत के मच्छर ऐसे जोरजोरसे काँटते कि सहा नहीं जाता। लेकिन दुष्मन आगे नंगी तलवारें लेकर हमारी तलाश कर रहा था। हम अंधेरेमें से दुष्मन को देख रहे थे। मच्छर काटने पर भी मुंहसे उफ् नहीं निकाल सकते थे। सरपे मौत जो मँडरा रही थी।

"सबेरे देखा तो सारा वदन फूल गया था। चेहरा फूलकर बदसूरत हो गया था। फिर भी दवा-दारु करनेकेलिए वक्त था नहीं। मौत पीछा कर रही थी।

"वैसे तो १६ आगस्ट के रात को गाँवसे दो मील दूर वाली बस्ती को आग से जलते हमने देखा। उस गाँव के दो जमीनदार आपस में हमेशा झगडा किया करते थे। झुट पुटकी आमजनी घटना होगी ऐसा हमने समझ लिया था। दिन निकलनेपर मालुम हुआ की मुसलमानोंने उस पुरे बस्ती को जलाकर खाक कर दिया।"

"ऐसी हालत में आप भारत कैसे पहुँच पाये?"-माझा प्रश्न.

"तुरंत गाँव छोडकर भाग जाना जरुरी था। लेकिन दो-चार मिलकर भागनेकी कोशिश करना भी मुनासिक नहीं था। कुछ तो डरके मारे मुसलमान बन गये। जिस जमींदार के यहाँ हम किसानी किया करते थे-मुसलमान होते हुए भी उसने हमारी मदद की। हिंदुओंको मार-काट करनेका काम तो मुल्ला-मौलवी किया करते थे। और गाँवगुण्डों ने हमारी मदद की, हमारी जानें बचायी।

हमने आजूबाजूके गाववाले हिंदुओंको इकठ्ठे किया। सबको मिलाकर बडा काफिला बनवाया। एकदम दो मील लंबा काफिला बना। इतने बडे काफिले पर हमला करनेकी दुष्मनोंकी हिंमत न बनी। कोटलीसे सुजाबाद १४ मील दूर था। कोटलीसे सबेरे निकले, रातके दो बजे सुजाबाद पहुँचे। वहाँ और भी हिंदू जमा थे। वहाँ से भारत की ओर जाना था। दो महीनेके बाद कही ट्रेनमें हमारा नंबर लगा। ट्रेनमें लाशोंके सडने-गलनेकी इतनी दुर्गंधी थी कि, अंदर पाँव रखना मुश्कील था। फिरभी नाक दबाकर अंदर बैठे गये। वहाँ से बाँका पहुँचे। बाँका बॉर्डर का पहेला स्टेशन था। वहाँ आने तक भूक और प्यास के कारण कितनेही बच्चों और मरिजोंने दम छोड दिया। जो मर गया उसकी लाश चलते ट्रेनके बाहर फेंक देते थे।

"बांधा स्टेशनपर पाँव रखनेकेलिए जगह न थी। वहाँ से कुरुक्षेत्र पहुँचने एक महीना लगा। कुछ पैदल कुछ ट्रेनसे रास्ता पार कर लिया गया। ... ..."

¤

शानीबाई जेठूराम, वय वर्षे ५५. या महिलेची कथा फारच हृदय-

द्रावक आहे. तिच्यावर गुदरलेला प्रसंग सांगताना आज देखील तिला गहिवरून येतं. तिच्या मनावर त्या प्रसंगाची धास्ती बसलीय. कालपरवाच तो प्रसंग घडून आला असावा आणि म्हणूनच एवढं सविस्तर लक्षात असावं अशा प्रकारे अगदी सविस्तर ती तो प्रसंग सांगते !

ती टैंकि गावात राहत होती. एक दिवसाआधीच तिचं लग्न झालं होतं. तिथं समजलं की मुसलमान कापायला येणार आहेत. सारी मंडळी जीव मुठीत घेऊन रात्रभर जंगलाजंगलातनं आडवाटेनं चालत होती. भीतीमुळे तिचा जीव जातो की काय असंच तिला वारंवार वाटायचं ! दिवस उजाडायच्या आधीच दुनियापुरला सारी मंडळी येऊन पोहोचली, त्यात ती देखील होती. दिवसभर तिथेच मुक्काम झाला. खाण्यापिण्याची काहीच सोय नव्हती. पाणी देखील प्यायला मिळू शकलं नाही. भुकेमुळे जीव कासावीस झाला होता. तिथून ट्रेनने लोध्रा स्टेशनवर येऊन पोहोचलो. मुसलमानांनी तिला स्टेशनवर थांबू दिलं नाही. साऱ्या मंडळीसोबत ती देखील स्टेशनपासून गावात जायला निघाली आणि मुसलमानांनी हमला केला, त्या प्रसंगाचं वर्णन तिच्याच शब्दात ऐकताना वास्तव आणि जिवंत प्रसंग उभा राहतो.

तिला ओडकीशिवाय दुसरी भाषा येत नाही. त्या भाषेत मराठी आणि हिंदीचे बरेच शब्द आहेत. त्यामुळे तिच्याच शब्दात समजायला जड जाणार नाही.

"सारी रातीचा सफर ने बोखेची वजह आम्ही डाली थकली हुती। तांबी मौतिचा डर ज्यादा हुता। लोध्रें स्टेशना कनु लोध्रें गां २ मैल पऱ्हा हुते। रस्ते महे खूब जंगल हुते। तांबी जाणे जरुरी हुते। अम्ही हुरती पल्ली। टेशना कनु दो हेक फर्लांग गेल्ली हुती के इतने महें मुससमानाणां अम्हानु घेरती गेल्हा। अम्हा नु दडकाल्ला डराल्ला। आम्ही हुरा कनू काम्पु पडती गेल्ली। वां आम्हानू आसियानू असग ते मर्दानु अलग करती ते। ते दूं लिके भारती। ते कतारा महें किरपाणला। साऱ्या मर्दांची तलाशी करू लागले। माच्या भाषा गोडू अम्हा साऱ्यांचे पैसे जमा हुते। ३०० रुपये हुते। तिलाशी करते करते माये भावाचे लोरच्या बंदाची तिलाशी करने वास्ते गेल्ले। ओ बेल्ले भार भावाची दिलनी झलिले। ओ हवाईची कली द्रोडला। ओन्हू डेखती सारी बंदी बंदी द्रोडं पडती गेल्ली। हा पत्ता नी रेल्हा कुण किगे पल्ले जाए। जिगे मुंहूं अल्ले मुंहूं द्रोडला। जिसे बेल्ले सारे द्रोडू पल्ले। ओ बेल्ले मुसलमाणा काटणे सुरु करती डिल्ले। में बी द्रोडू पल्ली। मुसलमाण माचे भासूं द्रोडले। माची भाभी मार लारे हुती। वा छोटी छोऱ्ही नू चती द्रौडती जायली। छोरी नू चती वा द्रोड न सचेली। विन्हे आपली छोरी नू भूकाती नाखण। ते खूद द्रोडू लागली। मनू भाभीवर कावीड लागली। मे द्रोडतिली छोऱ्ही नू चऊं लागली। इतने मेहें मुसलमाण च्या बरछया माई कण्डे मटें आती लागल्या। माया डुव्हा बट्टीच्या पार निकळलेल्या बरछया में आपर्ण। अखी लारे वेखल्या। कई परछया कण्डे मते। पास्ते महे। सथळा महें मारल्या मे बेहोश होणे कनू पहले वो छन्ही नू चत्तो छेल्ला। पिछे में बेहोश हुती गेल्ली। वां समझले हा मरती गेल्ली। यूं समझती ते चाळे गेल्ले।..."

मुसलमानांनी तिच्या शरीराची अक्षरशः चाळणी केली होती. तिच्या अंगातून भळभळ रक्त वाहत होतं. तिला शुद्ध आल्यावर तिने-सारं पाहिलं. परत मुसलमान येतील अशी तिला भीती वाटली. जवळच एक झुडुप होतं. त्या झुडुपात सरपटत ती जाऊन लपली. अंगातून भळभळ वाहणाऱ्या रक्ताकडे लक्ष जाताच परत ती बेशुद्ध झाली. तिला परत शुद्ध आली. आता तिच्या घशाला कोरड पडली होती. झुडपातनंच तिने इकडं तिकडं पाहिलं. थोड्याच अंतरावरून नहर पाणी भरून वाहत होता, कशीबशी तिथवर गेली. एक-दोन ओंजळ पाणी प्याली. तिला थोडं बरं वाटलं. पाण्याकडे लक्ष गेलं. भला मोठा साप तिथं दिसला. ती घाबरली. पाणी प्यायचं सोडून काठावर पळाली. घागरा रक्ताने ओलाचिंब झाला होता. घागऱ्याकडे लक्ष जाताच परत बेशुद्ध झाली.

त्याच अवस्थेत किती तरी वेळ ती पडून राहिली. शुद्ध आली तेव्हा उन्हाचे चटके बसत होते. थोड्याच अंतरावर एक भलं मोठं झाड होतं. सावली गर्द होती. त्या झाडाच्या सावलीत ती गेली. निर्जन जंगलात त्या झाडाखाली ती बसली होती. एकटीच. तिथं तिला झोप लागली की तिची शुद्ध हरपली तिचं तिलाच सांगणं कठीण होतं; पण तिने डोळे उघडले त्या वेळेस बरीच रात्र झाली होती.

सर्वत्र अंधार. निर्जन जंगल. कुठं जावं तिला काहीच सुचेना. नहराच्या काठाकाठानं पाय नेतील तिकडे ती जाऊ लागली. किती वेळ चालत होती तिचं तिलाच कळलं नाही. लांब अंतरावरून खर खर असा आवाज येत होता. तिला वाटलं पिठाच्या चक्कीचा आवाज असावा. त्या आवाजाच्या रोखानं ती चालत राहिली. नशिबाने लोध्रा शहरात येऊन पोचली. तिथं तिनं आपल्या गावकऱ्यांचा शोध घेतला. मुक्कामावर येऊन पोचली एकदाची. तिने विचारले—

"मारं मारके महूं कुण कुण वाचले?" पता लागला "सिर्फ माचा ओड (नवरा) बचला। बाकी आई, बोहीण, बा, भाऊ. भाभी सारी ची सारी बंदी मारली गेल्ली। ओ बेल्ले भामा अखींचे सामने अंधेरे आति गेल्ले। आंखी महूँ हिझवे ते बुता महूँ खून पल्ले विहे ले। सिर्फ ठोन बहूँ मजी पककडी। किल्या हुता ओ हुना माया ओड, माया माणूस, माया पती..."

अशा रीतीने तिचे सारेच नातलग कापले गेले होते आणि केवळ जिवंत राहिला होता तो तिचा नवरा ! केवळ एकमेव आणि शेवटचा आधार ! संपूर्ण कुटुंबाच्या सरणावर निखारा ठेवून मरणाच्या दाढेतून परत आलेल्या शांतीबाईची ही कथा !

## निर्वासितांचे आगमन

नागपूरवरून एक अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ महेगांव छावणीत साधारणतः सन १९४८ च्या जूनमध्ये दाखल झालं. ते शिष्टमंडळ या निर्वासितांना भेटलं. शेती करावयाची इच्छा असलेल्या १०० निर्वासित कुटुंबियांस चंद्रपूर जिल्ह्यात स्थायिक करायचा विचार असल्याचे निर्वासितांना सांगण्यात आले. चंद्रपूर जिल्ह्यात शेती करण्याकरता जाण्याची ज्यांनी तयारी दर्शविली अशा १०० कुटुंबियांची यादी तयार करण्यात आली. त्यांच्या १३ प्रतिनिधींना घेऊन अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ नागपूरला डेरेदाखल झालं. नागपूरला या १३ प्रतिनिधींना एका हॉटेलात उतरविल्यावर त्यांची बडदास्त एकदम टॉप

ठेवण्यात आली.

त्या वेळेस सि.पी. अॅन्ड बेरार प्रांताचे पुनर्वसनअधिकारी होते श्री. ए. पी. चौबे. त्यांनी छिंदवाडा सेटलमेंटच्या अंतर्गत ' रिहॅबिलिटेशन ऑफ रिफ्युझिज ऑन लॅण्ड इन व्याहाड फॉरेस्ट ब्लॉक या नावाची एक योजना तयार केली. योजना तयार करताना वारंवार या निर्वासित बांधवांना विचारात घेण्यात येत होतं त्यामुळं प्रत्येक वेळेला त्यांना असं वाटायचं की योजना आपल्याच मताप्रमाणे, आपणच तयार करवून घेत आहोत !

योजना तयार होताच प्रत्यक्ष स्थळ दाखवायचं ठरलं. त्याप्रमाणे त्या १३ प्रतिनिधींपैकी केवळ दोन प्रतिनिधी आज हयात आहेत. त्यापैकी प्रेमचंद वसंतराम यांची मुलाखत–

' क्या योजना आपने पढी थी ?'

' हमारे लिये तो काला अक्षर भैंस बराबर है । '

' फिरभी स्कीम अच्छी है या नहीं, आपने कैसे जाना ?'

' हमको क्या समझता था ? बडे साहाब ने हमको नागपूर के हाफीस में बुलाया । वो कुछ लिख रहा था । हमसे बोलता जाता था । लिखते जाता था । हमको पुछा २० एकर जमीन तुमको अच्छी करके देगा । तुमको कुछ भी करना नहीं पडेगा । सब खर्च सरकार का होगा । तुमको स्कीम पसंद है ? –'

हमने कहा ' बहुत अच्छा साब !'

उसने कहा ' हम तुमको ५००० रु. देगा । बीस साल के बाद लौटा देना । व्याज नहीं देना । हमने कहा ' आपकी बहुत मेहरबानी साब !'

' बस. इसी बातों से हमने जान लिया की स्कीम तो अच्छी है । हम किसान थे । किसान जमीन लालची होते हैं । हम जमीन के लालच में आ गये । '

' नागपूर में कौन से हॉटेल ठहरे थे ?'

' कुछ याद नहीं साब–'

' नागपूर में कौन सा काम करते थे ?'

' वहाँ क्या काम था ? खाना, रहना । निंद लगी तो सोना । नहीं तो घुमने जाना । नागपूर में जितना अच्छा खाना मिला था, फिर वैसा खाना खाने को नहीं मिला । "

' नागपूर में कितने दिन रहे ? '

' यही कुछ १५ दिन रहे होंगे ।'

' फिर चंद्रपूर कैसे आये ?'

' वही नागपूर के साब ने बोला, ' तुम चंद्रपूर जाओ । ' हमने बोला ' साहाब, हमको वहाँ कौन पहुचानेगा ?'

बडा साहाब बोला, ' हम आपको गाडी में बिठा देता हैं । ड्रायव्हर आपको चंद्रपूर पहुँचा देगा । वहाँ के अफसर आपको लेने आयेंगा । जबतक कोई लेने नहीं आयेगा गाडी के नीचे उतरनेका नही–'

हमने बोला ' बहुत अच्छा साब । '

' एक दिन हमारे सामने गाडी आयी । हमको गाडी में बिठाया । नागपूर से गाडी छुटी । चंद्रपूर पहुँच गये । चंद्रपूर पहुँचतेही उनको फोन मिला या तार किया मालूम नहीं । चंद्रपूर के बडे बडे साहाब लोग अपनी गाडियाँ लेकर वहाँ पहुँच गये ]

' हमारे शरणार्थी भाई आये– हमारे शरणार्थी भाई आये ' ऐसा कहकर हमारा स्वागत किया, हमारे गलों में फूल, बडे बडे हार डाले । चायपान हुआ–नाश्ता हुआ । एक हॉटेल में ले गए । (चौकशीअंती समजले हॉटेल नव्हे धर्मशाळा होती ती ! ) वहाँ हम सब ठहरे । वहाँ चार-आठ दिन रहे । खान–पान का अच्छा बंदोबस्त था । चंद्रपूर के हाफीसरों के स्वागत से हम पूरे दब गए !'

' चंद्रपूर में कौनसा काम था ?'

' वहाँ तो सिर्फ खाना घुमना और सोना ही था !'

' चंद्रपूर से फिर कहाँ गये ?'

' चंद्रपूर से व्याहाड आये !'

' आपके साथ चंद्रपूरसे कौन आये थे ?'

' चंद्रपूरके सभी अफसर हमारे साथ आये थे ।'

' आप लोग कहाँ ठहरे थे ?'

' हम लोग फॉरेस्ट का एक मकान था वहाँ ठहरे थे । '

' और अफसर लोग कहाँ ठहरे थे ?'

' अफसर लोग डाक बंगलेमें ठहरे थे । '

' वहाँ कितने दिन रहे ?'

' वहाँ करीबन १५ दिन रहे होंगे !'

' १५ दिन में क्या किये ?'

' जंगल में आना, झाड देखना । नहर देखा, पाणी की सुविधा देखी । आफीसरोंने समझाया गाँव कहाँ होगा, स्कूल कहाँ होगी, दवाखाना कहाँ रहेगा, बगीचा कहाँ रहेगा, गावका गोडाउन कहाँ रहेगा, दुकाने कहाँ रहेगी, सब समझाया । '

' फिर क्या हुआ ?'

' फिर हम सब १३ जन नागपूर गये । बडे साहाब को मिले । साहाब ने पूछा, ' जमीन पसंद है ?'

' हमने कहा बहुत अच्छी है साहाब । '

नागपूरहून हे सारे प्रतिनिधी मेंहगाव छावणीत परत आले. त्यांनी आपल्या बांधवांना सारे काही समजावून सांगितले. जबलपूर-कटनीमार्गाने छोटचा रेल्वेमार्गाने १०० कुटुंबियांना घेऊन ही प्रतिनिधीमंडळी मूलला आली. मूलवरून बैलगाडीने छावणीच्या ठिकाणी जाऊन पोचली. चंद्रपूर जिल्ह्यातील अधिकारीवर्गाने या निर्वासित कुटुंबांचे अतिभव्य स्वागत केले; परंतु या स्वागताच्या वेळची ओसंडून वाहणारी सहानुभूती, आतिथ्यशीलता अल्प काळातच लुप्त झाली.

### पहिल्या योजनेतील अटी

आर. आर. आर. क्र. ६५८२ दि. ९ ऑक्टोबर १९४८ या परिपत्रकाद्वारे महेगाव छावणीतील निर्वासितांना व्याहाडच्या फॉरेस्ट ब्लॉक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जंगलात प्रस्थापित करणारी योजना चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात आली. त्या योजनेतील अटी खालीलप्रमाणे होत्या :

१ : सी. पी. लॅन्ड रेव्हेन्यु कायद्याच्या अंतर्गत सी. पी. रयतवारी अधिकारातील २० एकर जमीन प्रत्येक स्थापित निर्वासिताला फुकट दिली जाईल.

२ : जमीन १८ महिन्यात शेतीयोग्य करून दिली जाईल.

३ : प्रत्येक कुटुंबाला ५०००/– रु. कर्ज दिले जाईल. त्यांपैकी १५००/– रु. ची सूट मिळेल.

४ : या कर्जाच्या व्याजाचा दर ३% असेल.

५ : व्याज जमीन शेतीयोग्य करून दिल्यापासून चौथ्या वर्षापासून सुरू करण्यात येईल.

वरीलपैकी एक देखील अट शासनाने पाळली नाही. संदर्भित अटीप्रमाणे १८ महिन्यांत प्रत्येक कुटुंबाला २० एकर जमीन शेती योग्य करून द्यायला हवी होती. १८ महिने तर जाऊ द्या ३१ वर्षात प्रत्येक कुटुंबाला २० एकर जमीन शेतीयोग्य करून देण्यात आली नाही!

| ५००० रु. कर्जाचे विवरण | रु. |
|---|---|
| घरबांधणीकरता | १०००/– |
| जंगल साफ करण्याकरता | १०००/– |
| बैलजोडीकरता | ६००/– |
| दोन गायी खरेदी करण्याकरता | ६००/– |
| शेतीच्या औजाराकरता | २००/– |
| बैलगाडीकरता | १००/– |
| हातखर्चाकरता | १५००/– |
| एकूण | ५०००/– |

वरील विवरणाप्रमाणे काहीएक झालं नाही ! प्रत्येत कुटुंबाला ५०००/– रु. ची रक्कम मिळू शकली नाही. ना प्रत्येक कुटुंबाला बैलजोडी मिळाली, ना प्रत्येक कुटुंबाला गाय बैलगाड्या दोन किंवा तीन कुटुंबे मिळून एक याप्रमाणे देण्यात आल्या. बैलजोडीचे वितरण त्याच पद्धतीने करण्यात आले. हातखर्चाकरता कुणालाच १५००/– रु. दिले गेले नाहीत. कुणाला १०० रु. तर कुणाला २०० असे वितरण करण्यात आले. मिळालं त्याला भरपूर मिळालं, नाही त्याचं नशीबच खोटं असा प्रकार झाला. बाकी कर्ज सर्वांच्या नशिबावर कोरलेलं, काळ्या दगडावरील रेषेप्रमाणे. यासंबंधीचे सर्व दस्तऐवज उपलब्ध नाहीत. ते गहाळ केले गेले असण्याचीही शक्यता आहे.

## नावे बदलणारी संस्था

पं. क्र. ६८५/४९ या क्रमांकाखाली सहकारी संस्था प्रथम पंजीबद्ध करण्यात आली. ही संस्था १९४९ मध्ये पंजीबद्ध करण्यात आली असावी असे सकृतदर्शनी वाटते; परंतु सदस्य करून घेण्याच्या फॉर्मवरून वाटते की, सोसायटीचा कारभार १९५० च्या नंतर सुरू करण्यात आला असावा.

या सहकारी संस्थेची नावे बदलत गेली ती याप्रमाणे–

१ : व्याहाड शरणार्थी वसाहत सरकारी शेती संस्था मर्यादित

२ : दि व्याहाड को–ऑपरेटिव्ह रिहॅबिलिटेशन कलेक्टिव्ह फार्मिंग कॉलनी लिमिटेड. या नावाचा उल्लेख १९५३ च्या पुढच्या कागदपत्री आढळतो.

३ : व्याहाड को–ऑपरेटिव्ह रिफ्यूजी रिहॅबिलिटेशन कलेक्टिव्ह कॉलनी सोसायटी लिमिटेड या नावाचा उल्लेख १९७३ च्या पुढच्या कागदपत्री आढळतो.

एकाच पंजीयन क्रमांकाखाली वारंवार नावे बदलणारी कदाचित ही पहिलीच सहकारी संस्था असावी. शासनकर्त्यांना वारंवार संस्थेची नावे का बदलावी लागली हे देखील न उलगडणारे कोडेच आहे.

एकाच नावाखाली झालेला आर्थिक घोटाळा दडपून टाकण्याकरताच ही बदलयोजना केली असावी असा संशय व्यक्त करण्यास बरीच जागा आहे.

## शासकीय वचनभंगाची परंपरा

१ : पत्र क्र. आर. आर. आर. ५१३५/३१२ दि. २२–८–१९४८ मध्यप्रदेश शासन (जुने) आणि पत्र क्र. आर. आर. ६५८२ दि.९ ऑक्टो. १९४८ नागपूर परिपत्रकाप्रमाणे वीस एकर जमीन शेतीयोग्य करून देण्यात येणार होती. ते वचन शासनाने पाळले नाही.

२ : सन १९५२–५३ च्या दरम्यान नवीन करार करण्यात आला. त्या कराराप्रमाणे १० एकर जमीन शेतीयोग्य करून द्यायची आणि प्रत्येक कुटुंबाला १० एकर जंगल द्यायचे ते त्यांनी स्वतः उठीत करायचे किंवा काय ते ज्याचे त्यानेच ठरवावे असे ठरले. या नवीन कराराची देखील अंमलबजावणी करण्यात आली नाही.

३ : संपूर्ण जमीन ठरल्याप्रमाणे शेतीयोग्य करून द्यायची जबाबदारी शासनाने स्वीकारली होती. जमीन-नांगरटी करण्याच्या नावाखाली दोन बुलडोजर आणि एक ट्रक खरेदी करण्यात आले. एक बुलडोजर परत करण्यात आला. ट्रक कुठे गायब झाला त्याची माहिती नाही; परंतु बुलडोजर आणि ट्रकचा प्रचंड किराया कॉलनीवर बसला आहे. एक मिनी बुलडोजर जो कॉलनीत आणताक्षणीच निकामी झाला आज देखील धूळ खात कॉलनीत पडला आहे. त्याच्या किंमतीचे कर्ज कॉलनीवर लादण्यात आले आहे आणि त्या कर्जाच्या ओझ्याखाली छावणी जमिनीत रुतत चालली आहे.

४ : सहकारी कृषी संस्थांचे उद्दिष्ट निश्चित करण्यासंबंधी महाराष्ट्र शासनाने १९७३ च्या जानेवारीत एक ठराव संमत केला होता. महाराष्ट्र शासन, कृषी आणि सहकार विभाग, ठराव क्र. सि. एस. एफ. आय. आणि १०७१/१३९९ क्र.४, सचिवालय अॅनेक्स मुंबई–३२. ९ जानेवारी १९७३)

या ठरावाप्रमाणे सहकारी शेती संस्थेतील सभासद व्यक्तिगत शेती करणार असतील तर त्यांना व्यक्तिगत पट्टे द्यायला हवे होते; परंतु आजपर्यंतदेखील त्या बाबतीत कायदेशीर कार्यवाही झाली नाही व या छावणीतील सारेच कुटुंबीय व्यक्तिगत शेती करतात. सहकारी पद्धतीने कधी काळी शेती असल्याचे कुणाच्याही स्मरणात नाही. तरी देखील व्यक्तिगत शेतजमिनीचे पट्टे का देण्यात आले नाहीत ते समजत नाही.

५. या छावणीचे पदसिद्ध अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. आजवर ज्या ज्या जिल्हाधिकाऱ्यांनी या निर्वासित छावणीला भेट दिली, त्या प्रत्येकाने त्यांना व्यक्तिगत पट्टे देण्याचे आश्वासन दिले; परंतु कुठल्याच कलेक्टरमहोदयांनी आपले वचन पाळले नाही !

## शासकीय लूट

सामंतपुत्र नोकरशहांनी १९५५–५६ च्या दरम्यान एक धान्य-

भांडाराची आगळीच योजना आखली. सभासदांनी वर्षाला एक पोते धान्य जमा करायचं. धान्य जमा करणाऱ्याला व्याज मिळणार नाही; परंतु ज्याला धान्य या धान्यभांडारातून उचलायचे असेल त्याने दीडपट व्याजाने या भांडारातून धान्य उचलावे असा अलिखित करार झाला. धान्यभांडारात कोणी किती धान्य जमा केले त्याची नोंद आज उपलब्ध नाही; पण धान्यभांडाराचं कोण किती देणे लागतो याची मात्र नोंद आहे.

'सन १९६८ तक. धान्यभाडार का हमारा ८०,००० रुपये का बॅलन्स था' अशी माहिती या संस्थेचे एक सभासद श्री. तुलदासजी बिके यांनी दिली; परंतु या ८०,००० रु. च्या बॅलन्सचे काय झाले? कुणालाच माहिती नाही!

धान्यभांडार उभारलं निर्वासितांनी, चालवलं सोसायटीनं. कर्जाच्या ओझ्याखाली चिरडले गेलेत निर्वासित!

आज धान्यभांडाराचं एकूण कर्ज २,१६,५२९·६७ रु. एवढं आहे आणि या प्रचंड कर्जाच्या ओझ्याखालून कसं निसटावं हा प्रश्न निर्वासितांना भेडसावणारा आहे.

**शासकीय पठाणी व्याज :** धान्यभांडाराच्या पठाणी व्याजाचं एक उदाहरण वानगीदाखल खाली दिलं आहे. धान्यभांडाराच्या एका सदस्याने दि. २३–१२–१९५६ ला ६ पोती धान्य धान्यभांडारातून कर्ज म्हणून उचलले. १९६६ मध्ये ९० पोती धान्याचं कर्ज झालं. ते कर्ज कसं वाढत गेलं ते या उदाहरणावरून लक्षात येण्यासारखं आहे.

| तारीख | मुद्दल धान्य पोते–शेर |
|---|---|
| २३–१२–५६ | ६–०० कर्ज उचलले |
| ५७ मध्ये | ८–६० झाले |
| ५८ मध्ये | २५–०० झाले |
| ६० मध्ये | २७–२७ झाले |
| ६१ मध्ये | ३३–२० झाले |
| ६३ मध्ये | ४१–७० झाले |
| ६६ मध्ये | ४४ क्वि. ७९ किलो झाले (अंदाजे ९० पोती धान्य) |

कदाचित पठाणदेखील एवढ्या चढत्या क्रमांकाचे व्याज आकारणार नाही; परंतु सहकारी संस्थेच्या या व्याजाच्या दराने पठाणी व्याजाला देखील मागे टाकले आहे!

## पाणीकरातील गलथानपणा

पाणीकर लावताना संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या कुटुंबाची किती ओलीत जमीन आहे याची अजिबात विचारपूस केलेली दिसत नाही. त्या कुटुंबप्रमुखाच्या नावाने जेवढी जमीन रेकॉर्डवर असेल त्यावर पाणीकर लावण्यात आलेला दिसतोय्. रेकॉर्डवर जमीन असणे म्हणजे ती संपूर्ण ओलीत आहेच असे होत नाही; परंतु याची शहानिशा करायला अधिकारीवर्गाला सवड असेल तर ना?

एका व्यक्तीच्या नावाने २० एकर जमीन रेकॉर्डवर आहे. त्याची ओलीत जमीन आहे १० एकर; परंतु त्याचेवर पाणीकर लावलाय २० एकरांचा! आहे की नाही गंमत? विशेष म्हणजे मागील तीस वर्षांपासून असंच चाललंय. कलेक्टरमहोदयांच्या ही बाब लक्षात आणून देण्यात आली. तरीदेखील काहीच निष्पन्न झालेलं दिसत नाही.

खालील तक्त्यावरील पाणीकरातील गलथानपणा सहज लक्षात येईल,

| नाव | ओलीत जमीन | पाणी कर लागलेली जमीन |
|---|---|---|
| जवाहरलालजी बिके | १० एकर | १४ एकर |
| देवराज कुडावले | ६ एकर | १० एकर |
| संतुराम बिके | ९ एकर | २० एकर |
| रामदयाल कलहिये | १२ एकर | १८ एकर |
| प्रेमचंद बिके | १२ एकर | २० एकर |
| संतुराम मजोके | ७ एकर | १८ एकर |
| नानकचंद मुरे | २·५ एकर | ६·५५ एकर |

याचप्रमाणे तीस तीस वर्षेपर्यंत जास्तीचा पैसा गरीब किसानांना अकारण भरावा लागतोय. याला जबाबदार कोण? या गरीब किसानांना कोणीच वाली नाही का?

कलेक्टरमहोदयांना यासंबंधाने एक निवेदन देण्यात आले. दर महिन्यात कमीत कमी एकदोनदा तरी यासंबंधात विचारणा केली जाते. मागील एक वर्षापासून सतत पाठपुरावा करण्यात येतोय, तरीदेखील निष्पन्न काहीच झाले नाही! जास्तीचा पाणीकर बंद होण्याच्या दृष्टीने कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या कॉलनीवरील जास्तीचा द्यावा लागणारा पाणी–कर केव्हा आणि कसा बंद होईल हा यक्षप्रश्नच आहे.

या छावणीत कुटुंबांची संख्या ८४. सोसायटीच्या दप्तरात नोंद आहे ७० कुटुंबियांची, सरकार मान्यता देणार आहे ५४ कुटुंबांना! साराच गोंधळ!

शासकीय जाचाला कंटाळून आणि या छावणीत कुठल्याही सवलती नीटपणे नाहीत हे बघून काही निर्वासित कुटुंबे पळून गेलीत. जी कुटुंबे पळून गेलीत त्यांच्यावर जे कर्ज आहे ते म्हणे सध्या जे सभासद छावणीत आहेत त्यांच्याकडून वसूल करण्यात येणार आहे.

शासन आपल्या नाकर्तेपणाचं खापर बिचाऱ्या गरिबांच्या डोक्यावर फोडणार असं दिसतंय!

**३० जून १९७८ अखेरीस कर्जाचा गोषवारा**

| कर्जाचा प्रकार | मुद्दल | व्याज |
|---|---|---|
| शासकीय कर्ज | ६०,३५८–८० रु. | – |
| पाणी–कर | ५५,६६८–०४ रु. | – |
| जिल्हा परिषद सेस | १०,१६८–५९ रु. | – |
| शेतसारा | १४,३९३–७५ रु. | – |
| मध्यममुदत कर्ज | ६,४१४–२२ रु. | ३,९९५–२२ रु. |
| अल्पमुदत कर्ज | १२,०९६–९९ रु. | ४८७३–०५ रु. |
| धान्यभांडार कर्ज | १,३४,३९१–८९ रु. | ८२.१३७–७८ रु. |

एकूण व्याजासहित ३.८४,२००–३५ रु.

**आणि हे प्रचंड कर्ज शासन केवळ ६४ कुटुंबियांकडून वसूल करणार असा अंदाज दिसतोय!**

## कडवट प्रतिक्रिया

तीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतरदेखील या निर्वासितांना जाणूनबुजून निर्वासितच ठेवण्यात आलंय्. त्यांच्याकडे कुठल्याच शासकीय यंत्रणेने ढुंकून देखील बघितलेले नाही. मृत्यूच्या दाढेतून भारतात आलेली ही मंडळी ज्या अवस्थेत आलीत त्याच अवस्थेत जगत आहेत!

येथील निर्वासितांच्या प्रतिक्रिया फारच कडवट आहेत आणि बोलक्या आहेत.

विष्णू गलगट नावाचा तरुण म्हणतो–' हिंदू कहलाकर हम भारतमें आये यह हमारी पहली गलती हो गयी। कौन जाने हमारे बुढोंको खुदको हिंदू कहलाने में क्या अभिमान था ? हम तो हिंदू और मुसलमानोंमें यहाँ कुछ भी फर्क नजर नहीं आता। मुसलमान बन कर वही रहते तो खुदका मकान तो होती ? हजार मुसिबतोंका सामना करते यहाँ आये थे तो क्या यही गुलामी के जंजीर में जखड लेने के लिए ? हमसे तो रास्तेका भिकारी अच्छा ! ना खुदका घर है ना खुद की जमीन-जबरन जोत करते–तीन-चार सालमें उनको पट्टे मिल जाते। तिस सालसे हम जोत कर रहे है हमको पट्टे क्यों नहीं मिलते ? साफ बात है कि सरकार हमको भारतीय नागरिक नहीं समझती। –'

थोडक्यात होत असलेल्या अत्याचाराचे स्वरूप याप्रमाणे आहे–

१ : तीस वर्षांपासून हे निर्वासित जमीन कसत आहेत. त्यांना ते वहीत करीत असलेल्या जमिनीचे पट्टे मिळालेले नाहीत किंवा त्यांना पट्टे मिळावेत याकरता आवश्यक असलेली कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२ : ते राहत असलेल्या घरावर देखील त्यांची मालकी नाही.

३ : ते जिथे राहत आहेत त्या वसाहतीला रेव्हेन्यु खेड्याचा दर्जा मिळालेला नाही.

४ : ज्या योजनेअंतर्गत हे खेडे वसविण्यात आले त्या योजनेप्रमाणे खेड्याची रचना करण्यात आलेली नाही. योजनेप्रमाणे खेड्यात सोयी उपलब्ध नाहीत.

५ : तीस वर्षांपूर्वी ज्या योजनेअंतर्गत हे खेडे वसविण्यात आले त्या योजना आज देखील पूर्ण झालेल्या नाहीत.

६ : प्रत्येकी २० एकर जमीन ओलीत करून देण्याकरता ट्रॅक्टर, बुलडोजर, ट्रक आदी बोलावण्यात आले होते. प्रत्येक कुटुंबाला २० एकर जमीन शेतीयोग्य करून देण्यात आली नाही; परंतु ट्रक, ट्रॅक्टर, बुलडोजर या सर्वांचं कर्ज मात्र कॉलनीच्या छाताडावर बसलंय्.

७ : तीस वर्षांपासून या वसाहतीतील गुरांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

८ : या छावणीतील रहिवाशांना कोणत्याच प्रकारचे कर्ज कुठनंच मिळण्याची सोय नाही.

९ : स्वतंत्र नागरिक म्हणून जगण्याची कुठलीच उपलब्धी त्यांच्याकरता नाही. खुल्या तुरुंगातील कैद्यासारखं जीवन त्यांना जगावं लागत आहे.

१० : हे सर्व संपूर्ण राजपुतान्यातील 'ओड' नावाचे आदिवासी; परंतु आदिवासींना उपलब्ध असलेल्या सेवा–सवलती त्यांच्याकरिता उपलब्ध नाहीत !

## गरिबांची संघटना

अशा परिस्थितीत या कॉलनीच्या नागरिकांनी कसं जगावं हा खरोखरच चिंतेचा विषय आहे शेतीचा व्यवसाय म्हणजे मान्सूनचा जुगार ! दरवर्षी उत्पन्न मिळेलच याची खात्री नाही. पिकाला भाव मिळेल याची हमी नाही. कर्ज मिळण्याची सोय नाही. काय करावं या निर्वासितांनी ? ते निर्वासित म्हणून भारतात आलेत हा काही त्यांचा गुन्हा नाही. हा निर्वासितपणा त्यांच्यावर लादला गेला आहे ! राजकारणाची खेळी करण्याकरता त्यांच्यावर निर्वासित होण्याची पाळी आणली गेली. त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी कुणाचीच नाही काय ? 'राहण्याकरता एखादी झोपडी बांधायला परवानगी देणे आणि रहायला सांगणे एवढाच अर्थ पुनर्वसनाचा काय ? इतर प्रांतात त्यांच्याबरोबर आलेल्यांना वसविण्यात आले. त्यांना स्वतःचं घर आहे. स्वतःची शेतजमीन आहे. असे असताना चंद्रपूर जिल्ह्यातील निर्वासितांची घुळधाण मुद्दाम का केली जात आहे ?

एकमेव 'गरिबांची संघटना' या प्रश्नाची तड लावण्यामागील एक वर्षापासून सतत प्रयत्नशील आहे. ह्या एक वर्षाच्या काळात पाच-सात वेळा मोर्चे काढून, दर महिन्याला निवेदने सादर करून, पंधरा दिवसांतून एकदा कलेक्टरला भेटून हा प्रश्न धारेवर धरला आहे. नागपूर अधिवेशनाच्या वेळेस पत्रके काढून बहुतेक पक्षांच्या आमदारांना–मंत्र्यांना दिलेली आहेत. स्थानिक वृत्तपत्रांमधून यासंबंधी लेख आलेले आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यास आवश्यक ते सर्व प्रयत्न गरिबांची संघटना करीत आहे; परंतु शासनाने डोळसपणे ह्या छावणीकडे लक्ष पुरविल्याचे दिसत नाही.

महाराष्ट्र पातळीवर संघटनांनी या प्रश्नांची तड लावण्यास आम्हाला सहकार्य करावं आणि आमच्या लढ्यास हार्दिक पाठिंबा द्यावा अशी विनंती करावीशी वाटते.

□


**व्हान गॉग**

'लस्ट फॉर लाइफ' या
आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा
मराठी अनुवाद

अनुवादिका
**माधुरी पुरंदरे**

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

## संध्याकाळचे पुणे....

पृष्ठ ३ वरून

रानडे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर या पिढीतले. नंतरच्या अनंत काणेकरांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी वडिलांच्या नावाला अजिबात फाटा दिला व लेखक–'अनंत काणेकर' एवढेच ते ठेवू लागले. त्या काळात ती भयंकर बंडखोरी होती ! वडिलांचे जन्मदात्याचे नाव गाळावयाचे ? काणेकरांची ही प्रस्थापिताविरुद्ध बंडखोरी तरुणांना आकर्षक वाटली. तरुणांना ते आपले वाटण्याचे कारण हेही असेल ! नावाची त्यांनी ही जी पद्धत पाडली तिचा माझ्या पिढीवर नक्की परिणाम झाला. अनेकांनी वडिलांचे नाव गाळले. मला समकालीन असलेले अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, अच्युत बर्वे, व्यंकटेश माडगूळकर वगैरे लेखकांची ही नावे अनंत काणेकर यांच्यापासून स्फूर्त झाली काय मला ठाऊक नाही; पण वडिलांचं नाव काढायचं हे काणेकरांच्या काळी वडील असताना मिशा काढण्याइतके पुरोगामी होते ! म्हणजे धक्का देणारे होते. ती हिंमत त्यांनी केली !

भाषणात पाध्ये यांनी सांगितले, काणेकर नवमतवादी म्हणून आले. त्यांची कविताही अगदी वेगळी होती. 'चांदरात'मध्ये प्रेमाचे सोळा प्रकार आले आहेत. ललितनिबंध लिहितानाही त्यांनी ठराविक पद्धत सोडली. नाट्यमन्वंतरामधून नाटकाकडे नव्याने पहावयास त्यांनी शिकविले. असे सांगून पाध्यांनी काणेकरांस श्रद्धांजली वाहण्यासाठी श्रोत्यांना दोन मिनिटे उभे राहण्याची विनंती केली.

मीही लेखारंभी काणेकरांना श्रद्धांजली वाहतो.

¤

त्या संध्याकाळी मॅजिस्टिकच्या गप्पांकडे जाताना आम्ही लक्ष्मीरोडने गेलो. वाटेत 'गोखले हॉल'मध्ये भांडवलया ग्रंथाचा प्रकाशनसमारंभ होता. क्षणभर मन द्विधा झाले. 'कॅपिटल' ग्रंथाच्या मराठी भाषांतराचे प्रकाशन कॉ. डांगे यांच्या हस्ते होणार होते. हॉलमध्ये गर्दी होती. बाहेर लोक विस्कळित उभे होते. कॉ. डांगे अजून आलेले नव्हते. का कुणास ठाऊक 'डांगे उशिरा येणार' असे माझ्या मनात आले. तोपर्यंत मॅजेस्टिकचा कार्यक्रम तासभर ऐकून यावा.

अशा विचाराने मी पुढे गेलो; पण तासाभराने परत येणार होतो तो आलो नाही. कम्युनिस्टांची ही सभा माझ्या मनाला ऐकावयास नको होती. ज्या ग्रंथाचा प्रकाशनसमारंभ कामगारमैदानावर हजारो हजारो कामगारांच्या समोर झडावा, सबंध व्यासपीठ असंख्य उंच उंच लाल निशाणांनी सुशोभित असावे व व्यासपीठावरून एक हात वर होताच कम्युनिस्टक्रांतीच्या जयजयकारांनी आकाश दणाणून जावे, त्याऐवजी लक्ष्मीरोडवरील गोखले हॉलसारख्या 'बूर्झ्वा'-वास्तूत जेथे पुरी हजार माणसेही बसू शकत नाहीत, जेथे कापडाचे बूर्झ्वा सेल लागतात, लग्नांचे बूर्झ्वा स्वागतसमारंभ होतात, तिथे तो समारंभ व्हावा, तोसुद्धा वेळेवर होऊ नये यामुळे मी उदास झालो. अशा शेवटाला कम्युनिस्टपक्ष यावयास नको होता. माझ्यासारख्या सामान्य नागरिकाच्या मताने, देशव्यापी कम्युनिस्ट क्रांतीचा विचार कामगारात न रुजवता, कामगारपुढाऱ्यांनी कामगारांना केवळ पगार वाढीचे लढे शिकविले त्याचा हा परिणाम आहे! कामगारांचे जागोजागी पगार वाढले; पण पक्ष संपला ! एक वेळ चुकून जनसंघ कम्युनिझम आणील; पण इथला कम्युनिस्टपक्ष नक्की कम्युनिझम आणू शकणार नाही, असे आता वाटू लागले आहे.

¤

या दिवशी मॅजेस्टिक गप्पांचा विषय तिथे जो जाहीर झाला तो असा 'नवोदितांची कविता, काव्य की 'गद्धेपंचविशी ?' या चर्चेचे संचालन प्रसिद्ध कवियत्री संजीवनी मराठे करणार होत्या व भाग घेणारे नवोदित कवी असे होते–राजा दीक्षित, रेखा इनामदार, अरुणा ढेरे, वसंत पासलकर, अनिल कांबळे, सुधीर मोघे, सतीश कामत. प्रस्तावात संजीवनीबाई म्हणाल्या, 'मला या कार्यक्रमासाठी कशाला बोलावलं हे कळत नाही...काव्याबद्दल मला प्रेम आहे व या मुलांना आस्था आहे. 'नवोदितांची कविता–काव्य की गद्धेपंचविशी' या विषयाने नवोदितांच्या काव्यावर प्रत्यक्ष आरोप झाला नसेल तरी सूर तसा वाटतो; पण मी तो गौरव आहे असे समजते. पंचविशीत प्रयोग करून पाहता येतात. या मुलामुलींशी मी आर्धा बोललेली नाही. एखादं आईमाणूस इथं असावं तशी मी आहे. त्यांच्यातील भांडणं मिटवण्यासाठी–चर्चा झाल्यावर वाद वाढू नये म्हणून समजावण्यासाठी.'

यानंतर वसंत पासलकर बोलला. तो म्हणाला, 'हा आरोप आम्ही इथे बसलेल्यापैकी कुणावर केला गेलेला नाही; पण आमचे इतर जे कवी मित्र आहेत, त्यांच्यावर हा आरोप केला गेला आहे. या आरोपाच्या विरुद्ध व बाजूने अशी येथे चर्चा होईल.'

यानंतर सतीश कामत म्हणाला, 'नवोदितांच्या कित्येक कवितांना कविता का म्हणावयाचे कळत नाही. यांना कवी म्हणण्यापेक्षा दुसरे काही म्हणावे. यांची समजूत कविता रात्री होते अशी आहे. म्हणून जरी ऐन दुपारी कविता केली तरी ती वहीत टिपताना वेळ मध्यरात्रीचा घालतात.'

नंतर त्याने नवोदिताची एक कविता म्हणून दाखवली.

तू आलीस, जसं फूल वेलीस.<br>
माझं मन ओलीस.<br>
माझी अवस्था अशी काय केलीस ?<br>
तू गेलीस अदृश्य झालीस.<br>
मी बाहेर उभा पोलीस.<br>
आता कुलूप आहे तुझ्या खोलीस.

सतीश कामत म्हणाला 'कवितेचा जीव फार लहान. एक भावविचार तीत असतो. कविता करणं सोपं वाटतं...कविता वाईट असते किंवा चांगली असते. वाईट कवितेचे कारण गद्धेपंचविशी नव्हे तर कमी अभ्यास!'

या गप्पांचा संचालक पासलकर म्हणाला, 'एक नवीन फॅड आलंय. अमुक एक पैसे द्या कविता छापून देतो ! अकरा रुपयाला दोन कविता. कविसंमेलनात वाचावी अशी पण एक योजना असते. अकरा रुपये देणं गाढवपणा आहे. पुण्यामध्ये प्रत्येक घरटी एक रेशनकार्ड व एक कवी आहे....नवोदित कवीचा मोठा दरारा आहे असे म्हणतात. जो मारुती रावणाला घाबरला नाही तो नवकवीला घाबरतो ! एकदा मारुतीच्या देवळावरून नवोदित कवी जाऊ लागला. त्याला पहताच मारुती देवळाचे छप्पर तोडून वर उडाला ! असा नवोदित कवींना दरारा असतो !'

नंतर रेखा इनामदार म्हणाली, 'बक्षिसं मिळतात, नाव छापून येतं म्हणून जे लोक कविता करितात त्यांच्यासाठी मी बोलत नाही. जे लोक मानापासून कविता करतात,

त्यांच्यासाठी बोलते...वृत्ती काव्यात्मक असणं व कवी होणं यात फरक आहे...पन्नास कविता झाल्या की कवींची वृत्ती कळावी... नवोदित कवी उदास उदास का लिहितात ? आपापला एक महामानव ते तयार करीतात. सगळा समाज आपल्या विरुद्ध उठलाय असं त्यांना वाटत असतं. नेहमी नैराश्य, वैताग व एकटं असल्यासारखं वाटत असतं.

पासलकरने रेखाची नवीन काव्याची ही समीक्षा अत्यंत उथळ पातळीची आहे असे सांगितले. राजा दीक्षित म्हणाला, 'काव्याच्या क्षेत्रात कवी असतात तसे कवडे असतात. 'कविता दशकांची' ही कविता पहा. 'अकरा रुपये देवून जे कविता छापतात त्यांनी स्वतःचे असे मनोरंजन केले तर काय बिघडले ? त्या मंडळात म्हातारे कवी जास्त असतात. देवीने दृष्टान्त दिला म्हणून एका म्हताऱ्याने कविता केली. ... रेखाने 'पालव' या संग्रहास उत्कृष्ट म्हटले. तो उत्कृष्टच आहे...केशवसुतांचीही प्रत्येक कविता चांगली नसते....पालवकाराची मूळ वृत्ती वेगळी आहे. तो सामाजिक कविता करतो व फसतो. हमीदच्या वर्षश्राद्धाचे वेळी तो फसतो....श्राद्ध ही कल्पना जुनी आहे.'

¤

सतीश कामतने, कवितेला नाव नसणं हे कवितेचं व्यवच्छेदक लक्षण आहे का ? असा प्रश्न विचारला. नंतर त्याने राजा दीक्षितची 'वांझ' कविता म्हणून हशा पिकविला. तेव्हा ही कविता एस. पी. मधे पी. डी. ला असताना आपण केल्याचे दीक्षितने सांगितले व त्या वेळची कामतची 'सखे तू तळशील बटाटेवडे' या कवितेचा उल्लेख करून तो म्हणाला, 'माझी वांझ किंवा कामतची 'बटाटेवडा' कविता त्या वयात विडंबनात्मक कविता कराव्याशा वाटतात त्याचे द्योतक होत्या. आज त्या कवितांवरून मूल्यमापन करणे चूक आहे.'

रेखा इनामदार म्हणाली, 'बहुसंख्य काव्यांतून आज समीकरणं दिसतात. फिनिक्स, ओॲसिस, डोक्यावर नियतीचं ओझं.' वगैरे शब्दप्रयोग सहज केले जातात. त्यातून काही हाती लागत नाही. खोटा शब्दांचा नाद कवींना लागतो. वाटेल तसे शब्द एकापुढे एक ठेवले जातात. एका बाजूला हे टोक– दुसऱ्या टोकास अत्यंत छंदबद्ध कविता. तीही फसलेली असते.'

अरुणा ढेरे म्हणाली, 'सबंध आयुष्यातच विसंगती आली आहे. सबंध दशकाच्या साहित्यांत अर्थशून्यता का यावी याचा विचार केला पाहिजे.

शेवटी समारोप करताना संजीवनीबाई म्हणाल्या, 'नव्या कवितेत दुर्बोधता येणं हे स्वाभाविक आहे.' आपण आई माणूस आहोत या भूमिकेतून त्यांनी सुरुवात केली होती. त्यावरच शेवट करीत त्या म्हणाल्या, 'थोडीशी मुले भांडखोर निघाली. हे व्हायचच'.

नंतर प्रत्येक कवी व कवियत्री यांनी दोन दोन कविता म्हटल्या व संजीवनीबाईंनी कविता म्हणून त्या दिवशीच्या गप्पा संपल्या.

¤

प्रश्न असा की येथे जे नवोदित कवी आले त्यांतले कितीजण काव्य करीत राहतील ? आणि त्यांच्यात एखादा महाकवी असेल का? नव्या काव्यातील एकलेपण,उदासता, वांझपण जीवनांतली विसंगती वगैरे खूप बोलणे चर्चेत झाले; पण ज्या कविता मुलामुलींनी वाचून दाखवल्या ते परंपरागत काव्याहून फारसे निराळे नव्हते. (अर्थात त्यांत दोष नाही.) कदाचित मनाला रुंजवतील अशा आपल्या कविता कवींनी निवडल्या असाव्यात.

एकूण कार्यक्रम रंगला छान. कवीला आपल्या कवितांबद्दल सांगता येते की नाही हाही त्यात एक भाग धरावा लागेल; पण आयुष्यांत चांगल्या आठवणी ठेवून जाणाऱ्या गोष्टी घडाव्यात, तशी मॅजेस्टीकच्या आजच्या गप्पा ही गोष्ट या मुलामुलींच्या आयुष्यात घडली. पुढे मोठे झाल्यावर त्यांच्यापैकी कुणी कविता करीत राहील, कुणी नाही पण 'गद्धेपंचविशींत' आपण एकदा मॅजेस्टीकच्या वासंतिक गप्पा रंगवल्या असे त्यांना आपल्या पुत्रपौत्रांना सांगता येईल. !

□


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?

राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## चित्रपट

सदानंद बोरसे

# आप के दिवाने

### तेच ते अन् तेच ते......

' Friendship never ends ' हे तात्पर्य पटवून देण्यासाठी आणि 'सनातन मित्र-धर्माचा जयजयकार असो !' अशा उंच आरोळ्या मारण्यासाठी आजपर्यंत कित्येक चित्रपट निघाले. 'यार की यारी पे जान कुर्बान'चा मसाला तर बहुतेक प्रत्येक हिंदी चित्रपटात असतो, तर 'आप के दिवाने' हाही याच माळेतील एक फुटका मणी.

राम (ऋषी कपूर) आणि रहीम (राकेश रोशन) हे दोघे अत्यंत जीवश्चकंठश्च मित्र. त्यातही मग ही धर्मनिरपेक्षता वगैरे आणखी ठसवण्यासाठी राम उर्दूमध्ये गड्डा तर रहीम हिंदीमध्ये बेमिसाल ! राम नाटकात हुशार तर रहीम खेळात. मग दोघांचा वाढदिवसही एकाच दिवशी असणे, त्या दिवशी एकाने जाकीट विकून दुसऱ्याच्या गिटारसाठी तारा आणणे आणि दुसऱ्याने गिटार विकून एकासाठी जाकिटला मॅचिंग अशी पँट आणणे वगैरे हमखास दिलभिडक आयडिया आहेतच. पुढे एका मुलीला—समीराला (टीना मुनीम) उर्दू व हिंदी शिकवायला म्हणून अनुक्रमे राम म्हातारा मौलवी बनून आणि रहीम शिक्षिका बनून जातात. दोघेही समीराच्या प्रेमात पडतात आणि ते एकमेकांना कळल्यानंतर 'तूच घेऊन टाक रे समीरा !' 'नाही, नाही, तूच घेऊन टाक !' असा मोठ्या प्रमाणावर एकमेकांना आग्रह करतात. अखेरीस रामभाऊ 'बरं, आता तुझा एवढा आग्रहच आहे; तर—' असे म्हणत रहीमभाईच्यापुढे मान तुकवतात आणि ' Friendship never ends !'

या संपूर्ण कथेतील दोस्ती, संगमपासून प्रोफेसर, रफूचक्करपर्यंतचे संदर्भ सुज्ञांना सांगायला नकोतच.

याशिवाय अन्य अनेक गोष्टीही अशाच इतर चित्रपटांची सहीसही आठवण करून देणाऱ्या. उदाहरणार्थ—'हम तो आपके दिवाने हैं, बडे मस्ताने हैं आऽ हाऽ ओऽ होऽ' एवढी एकच ओळ अडकलेल्या रेकॉर्डप्रमाणे पुन्हा पुन्हा म्हणत चालणारा राम, रहीम आणि जितेंद्र (मेहमान कलाकार) यांचा भडक प्रकाशातील नाच ऊर्फ तंगड्या उडवणे आणि उड्या मारणे ' Saturday Night Fever ' ची आठवण देणारे किंवा चित्रपटातील रिटायर्ड सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस इन्शाल्ला खान (अशोककुमार) आणि रिटायर्ड कर्नल विक्रमसिंह ठाकूर (प्राण) ही आपल्या गमाडी—गंमत—जमाडी जमतीने बालप्रेक्षकांना हसायला लावणारी जोडी 'व्हिक्टोरिया नं. २०३' ची याद करून देणारी.

चित्रपटातील कलाकारांनीही अन्य चित्रपटांप्रमाणे यातही पाट्या टाकलेल्या. विशेषत: टीना मुनीमची बऱ्या अभिनयाबद्दल दुष्कीर्ती कधी नव्हतीच ! तो डाग लागणार नाही याची काळजी तिने या चित्रपटातही घेतली आहेच; पण यापूर्वी 'बातों बातों में' वा 'देस परदेस'मध्ये तिच्या बऱ्या दिसणाऱ्या चेहऱ्याडे बघून त्यावरची कोरी, ठोकळेबाज भावहीनता, तोंडातून एकाच कंटाळवाण्या संथ लयीत बाहेर पडणारे संवाद सहन तरी व्हायचे. 'आप के दिवाने'-मध्ये ती बरे दिसण्याचे फारसे मनावर घेत नाही.

चित्रपटातील आनंद बक्षी यांची गीते म्हणजे पुन्हा 'तेच ते अन् तेच ते' असले तरी संगीतकार राजेश रोशन यांची कामगिरी त्यातल्या त्यात बरी.

चित्रपटाच्या या 'तेच ते' पणाची लागण या लेखालाही झाली असल्यास 'नाइलाज को क्या इलाज' असे म्हणतो आणि पेन ठेवतो. ❑